
# श्री साईलीला



"साईबाबा गुरूंच्या समाधीस वंदन करताना"

ऑगष्ट ] किं. ६० पैसे [ १९,७९

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

रात्रंदिन कर्दमी लोळती ।
श्वानसूकरें विष्ठा भक्षिती ।
विषयभोग तींही भोगिती ।
तीच का महती नरदेहीं ॥ ८७ ॥

होय जेणें चित्तशुद्धि ।
जेणें अखंड ब्रम्हसिद्धि ।
ते स्वधर्माचरण आधीं ।
तप हें साधी नरदेहें ॥ ८८ ॥

साधु सेवा मुक्तीचें घर ।
स्त्रैणसंग नरकद्वार ।
हे पूज्य वृद्धजनोद्धार ।
विचारार्ह सर्वथा ॥ ८९ ॥

सदा सदाचार संपन्न ।
देह निर्वाहापुरतें अन्न ।
गृहदारादि स्पृहाशून्य ।
ऐसा जो धन्य तो साधु ॥ ९० ॥

जे जे अनिमेष चिंतिती साई ।
प्रचीतीची पहा नवलाई ।
स्वयें साई तयास ध्याई ।
होऊनि उतराई तयांचा ॥ ९१ ॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ३७ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] ऑगस्ट १९७९ [ अं. ५

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका – ऑगस्ट १९७९


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | ३ |
| २) | श्रीसाई शरणानंद | ४ |
| ३) | श्री. दामोदर जोगळेकर | ८ |
| ४) | डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर | ९ |
| ५) | श्री. गोपीनाथ तळवलकर | ११ |
| ६) | श्रीमंत अनुताई वहिनीसाहेब घोरपडे | १२ |
| ७) | श्री. अ. ज. व ग. ज. चितांबर बंधूद्वय | १७ |
| ८) | मार्तंड महाराज भगत | २० |
| ९) | श्री. आत्माराम शिरोडकर | २१ |
| १०) | सौ. शांताबाई नावलकर | २२ |
| ११) | श्री. नागनाथ कोत्तावार | २३ |
| १२) | श्री. बाबुराव जगताप | २५ |
| १३) | श्री. बाळकृष्ण गोरक्षकर | २६ |
| १४) | श्रीमती अंबूताई मुळे | २८ |
| १५) | श्री. लक्ष्मणमामा नाईक | ३० |
| १६) | श्री. रामकृष्ण कोठारे | ३१ |
| १७) | श्री. बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी | ३४ |
| १८) | श्री. नानासाहेब रासने | ३६ |
| १९) | श्री. आप्पा सुतार | ३८ |
| २०) | श्रीमती ताई निमोणकर | ३९ |
| २१) | डॉ. गजाननराव दाभोलकर | ४० |
| २२) | सौ. व श्री. सखारामपंत दिक्षीत | ४१ |
| २३) | डॉ. रा. सी. कापडी | ४२ |
| २४) | श्री. श्रीकृष्ण गणपत कोठारे | ४३ |
| २५) | श्री. शूरसेन शामराव जयकर | ४४ |

# संपादकीय –

पु. न. वि. वि.

संतचुडामणि भगवान श्रीसाईबाबांच्या ६० व्या व ६१ व्या अशा महत्वाच्या पुण्यतिथीनिमित्य आम्ही जी १३ खास अंकांची योजना वर्षापूर्वी जाहीर केली व त्यानुसार श्रीसाईलीलेने आतापर्यंत जे खास अंक प्रसिद्ध केले त्यापैकी हा ११ वा अंक आहे. अनेक साईप्रेमी या खास अंकाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहात असतील यात शंकाच नाही. तेव्हा तो कुतुहल, आदर, प्रेम, श्रद्धा इ० सर्व प्रकारच्या अत्यादराच्या भावना साठविणारा हा खास अंक श्रीसाईप्रेमींच्या हाती देण्यात आम्हास नेहमीप्रमाणेच समाधान वाटत आहे.

आज विसाव्या शतकात साईभक्त बाबांच्याबद्दलची परम आदराची भावना कसकशी व किती विविध प्रकारे व्यक्त करतात हे आपण पहातोच. अशा वंदनीय महापुरुषाचे चर्मचक्षूंनी दर्शन घेतलेल्या व्यक्ती खरोखरच महाभाग्यवान होत असे आम्हाला वाटते. जसजसे दिवस पुढे पुढे जात आहेत तसतशा या अशा व्यक्ती आपल्या दृष्टीआड होत आहेत. या खास अंकाच्या निमित्याने श्रीसाईनाथांना पाहिलेल्या व्यक्तींना आपापली माहिती पाठवा. ह्या दृष्टीने आम्ही हाक दिली खरी परंतु जसा पाहिजे तसा प्रतिसाद काही आला नाही. याला अनेक कारणे असू शकतील. असो – या विशेषांकात साईनाथांना डोळे भरून पाहिलेल्या, त्यांचेकडून उदी प्रसाद इ० चा लाभ मिळालेल्या, त्यांचा शुभाशिर्वाद लाभलेल्या, त्यांच्या सहवासात काही काळ घालविलेल्या अशा काही 'लकीं'ची माहिती व त्यांचे पत्ते आम्ही वाचकांना पुरवीत आहोत. यापैकी काही व्यक्ती आमच्या श्रीसाईलीलेच्या लेखक-कवी स्नेहसंमेलनास हजर राहिलेल्या आहेत. या अंकाच्या निमित्याने ज्या साईप्रेमींनी आम्हास साहाय्य केले त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

**जय श्रीसाईराम**

# नव्वद वर्षांचे श्रीसाईशरणानंद
# शंभर वर्षांचे श्री. द्वारकानाथ जोगळेकर

— सदानंद चेंदवणकर
' राधा-माधव ' १२०/४०५५ टिळकनगर
मु. पो. चेंबुर, मुंबई ४०००८९



श्रीसाई शरणानंद

श्रीसाईबाबांना पाहिलेल्या इतकेच नव्हे तर त्यांचा दिर्घकाळ सहवास लाभलेल्या व आज हयात असलेल्या सुसंस्कृत भक्तांत श्रीसाईशरणानंद यांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. त्यांचे संपूर्ण नाव श्री. वामनभाई प्राणगोविंद पटेल. त्यांचा जन्म ५ एप्रिल १८८९ रोजी सुरत जिल्ह्यातील इतिहास प्रसिद्ध बारडोली तालुक्यातील मोटा या खेडेगावी झाला. त्यांचे वडील श्री. प्राणगोविंद लालभाई पटेल हे सरकारच्या मीठ खात्यात नोकरीस होते. वामनभाईंच्या मातोश्रींचे नाव मणिगौरी बेन. त्या तत्कालीन शिक्षण तज्ञ श्री. तुळजाराम सोमनाथ यांच्या कन्या होत.

वामनभाईंचे गुजराथी सातवीपर्यंतचे शिक्षण मोटा येथे झाले. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह श्री. अंबाराम कृष्णाशंकर शुक्ल यांच्या कन्या कलावती यांचेशी झाला. पुढे दुय्यम शिक्षणासाठी त्यांनी आपले नाव मुंबईच्या भर्डा हायस्कूलात दाखल केले. १९०६ साली ते मॅट्रिक झाले. पुढे एलफिन्स्टन कॉलेजात त्यांनी प्रवेश केला व १९१० साली तत्त्वज्ञान हा विषय घेऊन ते बी. ए. पदवीधर झाले. १९१२ साली ते एल. एल. बी. वकील झाले. त्यांना सॉलिसिटर व्हावयाचे होते. त्यासाठी म्हणून त्यांनी जहांगीर, गुलाबभाई व बिलिमोरिया या सॉलिसिटर्सच्या पेढीमधे आर्टिकल्स क्लार्क म्हणून नाव नोंदविले.

लहानपणापासूनच वामनभाईंना देव, धर्म व साधुसंत यांचेबद्दल प्रेम होते. वयाच्या सातव्या वर्षी आपल्या चुलत्यांबरोबर श्रीसोमनाथ दर्शनाला जाण्याचा त्यांना योग आला. तिथे मंदिराबाहेर त्यांना एक फकीर दिसला. त्यांना पुढे अनेकदा याच भागात त्या फकीराचे दर्शन घडले. पुढे १९११ साली प्रथमच त्यांनी शिरडीत श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले; तेव्हा त्यांना असे कळून चुकले की सोमनाथ मंदिराजवळ भेटलेले फकीर म्हणजे हेच श्रीसाईबाबा होत. १९११ साली त्यांच्या मनाला शिरडीस श्रीबाबांच्या दर्शनाला जाण्याची भारी ओढ लागली व त्याप्रमाणे ते गेले. तिथे त्यांचे मन अतिशय रमले. शिरडीस ते मुंबईहून कोपरगावला गेले व तेथून टांग्याने शिरडीस गेले. ते शिरडीस पोचले त्यावेळी साठेवाड्याजवळील (गुरुस्थानाजवळील) कडुनिंबाच्या झाडाखाली साईबाबा उभे होते. टांगेवाल्याने त्यांना हे बघा साईबाबा असे बोटाने दाखविले. वामनभाई लगेच टांग्यातून खाली उतरले व त्यांनी बाबांना साष्टांग नमस्कार घातला. त्यावर साईबाबा त्यांना म्हणाले, "ईश्वर आहे. नाही का म्हणतोस ?" कडुनिंबाच्या झाडाखाली झालेल्या या प्रथम संभाषणामुळे वामनभाईंचे सारे जीवनच पालटून गेले; त्यांच्या मनातील सर्व संदेह विरले व त्यांना असे वाटले की आपला सद्गुरु आपल्याला भेटला, व त्याला आपण आपले सर्वस्व अर्पण करावे.

१९१२ साली कोर्टाला उन्हाळी रजा पडल्यामुळे ते शिरडीला गेले व रजा संपताच ते परत मुंबईस जावयाचे खरे पण आश्चर्य असे की, बाबांनी त्यांना तिथे ठेवून घेतले. वर्षभर त्यांना तिथून हलूच दिले नाही. त्यांनी जाण्याची तयारी करावी व बाबांनी त्यांना काहीना काही कारणाने जाण्याची परवानगीच देऊ नये असे व्हायचे.

१९१६ साली आपली काही परिचयाची मंडळी शिरडीस जात आहेत तेव्हा त्यांचे बरोबर हार, फुले, प्रसाद इ० देण्यासाठी म्हणून ते स्थानकावर गेले आणि काय आश्चर्य ! आपल्या अंगावरच्या कपड्यानिशी त्यांना शिरडीस जावेसे वाटले, व तडक ते तसेच निघाले. तिथे चांगले २१ दिवस ते राहिले. शिरडीस गेल्यावर बाबा त्यांचीच वाट पाहात आहेत असे त्यांना आढळून आले. ते बुटी वाड्या-जवळ असताना एकाएकी एक दगड घरंगळत आला व तो त्यांच्या डोक्यावर आदळला. त्यामुळे काही काळ ते बेशुद्ध पडले. बाबांना हे समजताच त्यांनी लगेच औषध पाठवून दिले. त्यामुळे ते शुद्धीवर आले. जखम काही झाली नाही. परंतु तिथे असलेल्या काळात ते एक प्रकारच्या गुंगीत होते. साईबाबा त्यांना 'बाबू' या लाडक्या नावाने हाक मारीत असत.

पुढे वामनभाई ३-४ वर्षे अमदाबादच्या मॉडेल हायस्कूलमध्ये प्राचार्यपदावर होते. नंतर १९२१ साली ते पुन्हा मुंबईस आले व त्यांनी मेसर्स कांगा ॲण्ड सयानी या कंपनीत मॅनेजिंग क्लार्क म्हणून नोकरी पत्करली. १९२३ साली सॉलिसिटर झाल्यावर क्रॉफर्ड बेली या पेढीत त्यांनी सहाय्यक म्हणून काही काळ काम केले; व त्यानंतर नानावटी आणि कंपनीत राहिले पण त्या कंपनीच्या भागीदारांचे निधन झाल्यावर परळकर, पटेल आणि कंपनी अशी स्वतःची पेढी त्यांनी सुरू केली. पुढे प्रकृती ठीक राहिना म्हणून त्यांनी मुंबईला रामराम ठोकला; व अमदाबाद येथे लॉ कॉलिजमधे प्राध्यापक म्हणून व नंतर १९५० साली निवृत्त होईपर्यंत उमरेठ येथील हायस्कूलचे आचार्यपद त्यांनी विभूषित केले.

१९५१ साली त्यांच्या पत्नी सौ. कलावतीबेन या स्वर्गवासी झाल्या. त्यांच्यापासून त्यांना एक पुत्र व एक कन्यारत्नाची अपत्यसंपदा लाभली. पुत्र अकाली निधन पावला, पण कन्येला चांगले स्थळ लाभले. त्यांचे नाव श्रीमती त्रिवेणीबेन जोशी असे असून आपल्या वडीलांचेप्रमाणेच त्यांची पण साईबाबांवर गाढ श्रद्धा आहे.

१९५३ साली वामनभाई सान्या संसारपाशातून मुक्त झाले. त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारले व 'श्रीसाई शरणानंद' हे नाव धारण केले. स्वतः साईनाथांनी त्यांना केव्हा व कसा संन्यास घ्यावा याची तपशीलवार सूचना केली होती. त्यांनी धारण केलेले टोपण नाव बाबांच्यावरील त्यांची श्रद्धा, भक्ती व प्रेम याचे निदर्शक आहे असेच म्हणावयास हवे. सध्या ते भगवी वस्त्रे धारण करतात व त्या वस्त्रांना शोभा येईल अशाच प्रकारे ते वागतात.

आपल्या गुर्जर बंधूंना श्रीसाईंचा जास्तीत जास्त परिचय करून देण्याच्या उद्देशाने त्यांनी 'श्रीसाईबाबा' हा सुमारे ४०० पानांचा ग्रंथ १९४६ साली लिहून तो प्रसिद्ध केला. तो इतका लोकप्रिय झाला आहे की आजवर त्याच्या सहा-सात आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. याशिवाय अमदाबादच्या सस्तु साहित्य वर्धक या प्रकाशन संस्थेने त्यांची भगवद्‌गीता, श्रीशंकराचार्य, मनुष्यधर्म, सती सावित्री, श्रीप्रल्हाद, अंबरीष, शुकदेव, गजेंद्रमोक्ष, संत ज्ञानदेव, धर्मकथा, चांगदेव पासष्टी, नित्यपाठ जपनामस्मरण इ० पुस्तके प्रकाशात आणली आहेत. याशिवाय श्रीरामकृष्ण परमहंस वचनामृत, उपासनी चरित्र, उपासनी महाराजांची प्रवचने, परमेश्वर प्राप्ती, स्त्रीनु ऐश्वर्य, सिद्धांतमाला इ० पुस्तके प्रसिद्ध करून गुजराथी साहित्यात धार्मिक व अध्यात्मिक विषयांचे दालन शोभविले आहे, समृद्ध केले आहे. हेमाडपंतांच्या श्रीसाई सच्चरिताचे गुजरातील भाषांतर त्यांनीच केले आहे.

दक्षिणेला जसे सुविख्यात साईभक्त कै. नरसिंहस्वामीजी हे लाभले त्याचप्रमाणे गुजरातला श्री. वामनरावजी उर्फ साईशरणानंदजी लाभलेले आहेत. आज नव्वद वर्षांचे ते झाले आहेत तरी सुद्धा श्रीसाईबाबांचे नामजप ते करतातच करतात.

---

**श्रीसाईबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्य—**

श्रीसाईबाबांचा जगात पहिला ठसा (ब्लॉक) बनविणारे विख्यात साईभक्त **श्री. डी. डी. नेरॉय** यांची साईभक्तांना अपूर्व भेट!

कोणती ? पुढील अंकात वाचा.

# साईभक्त श्री. दामोदर जोगळेकर

● श्रीसाईदर्शन अनेकदा घेतलेले व केवळ श्रीसाईदर्शनासाठीच शिरडीत तब्बल पाच महिने मुक्काम करणारे एक साईभक्त आज मुंबईत दादर विभागात (इंदु भुवन, तळमजला, रानडे रोड एक्सटेंशन) रहात आहेत. त्यांचे नाव आहे श्री. दामोदर काशिनाथ जोगळेकर. आज त्यांचे वय किती आहे म्हणाल? १०१ वर्षांचे! १९१६ साली त्यांना प्रथम श्रीबाबांचे दर्शन घडले. त्यावेळेस ते ३५-३६ वर्षांचे ऐन तारुण्यातले सद्‌गृहस्थ होते. श्री. जोगळेकरांचा जन्म १६ जून १८७९ रोजीचा. ते इंदूर संस्थानात होळकर नरेशांचे पदरी नोकरीस होते. पुढे तेथल्या चंद्रिका महिला विद्यालयात व नंतर शिक्षण खात्यात त्यांनी प्रवेश केला. साई-बाबांना शिरडीत जाऊन आपण पहावे अशी एक सुप्त इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. ते इंदूरहून परभणी व परभणीहून कोपरगावी आले व दररोज सकाळी ६ वा. कोपरगावहून निघून आठ वाजेतोयेंत शिरडीत येत. द्वारकामाईत बसत व सायंकाळी पुन्हा कोपरगावी जात. त्यावेळी महिन्याला ५ रुपयात त्यांचे उत्तम पोट भरत असे. बाबांपाशी त्यांनी मनातून प्रार्थना केली होती की, आपल्याला शंभर वर्षांचे आयुष्य लाभावे; व जर तसे लाभले तर शंभराव्या वाढदिवसाला आपण तुमच्या चरणा-जवळ १००१ रु. देऊ. महाआश्चर्य असे की श्री. जोगळेकरांना १६ जून १९७९ रोजी १०० वर्षे पूर्ण झाली व म्हटल्याप्रमाणे दादरच्या अक्कलकोट स्वामींच्या मठात पादुकांवर १००१ रु. ठेवून ते आले सुद्धा! आपल्या शिरडीच्या वास्तव्यात बाबा आपल्याशी कधीच काहीएक बोलले नाहीत असे श्री. जोगळेकर सांगतात. पण श्रीसाईबाबा एक थोर साक्षात्कारी सत्‌पुरुष होऊन गेले असे ते वारंवार सांगतात. या वयातही श्री. जोगळेकरांची शरीरप्रकृती उत्तम असून रोजची त्यांची साईनाम जपमाळ असतेच असते.

★ ★ ★

साईभक्त —

# डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर



● डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर हे साईनाथांना पाहिलेले मुंबापुरीतील एक सुविद्य भक्त आहेत. त्यांचा जन्म २६ एप्रिल १९०६ रोजी ठाणे जिल्ह्यातील अर्नाळा गावी झाला. अण्णसाहेबांना श्रीबाबांचे दर्शन घडले ते १९१८ साली जानेवारीतल्या पहिल्या आठवड्यात वयाच्या बाराव्या वर्षी. आपले चुलते श्री. रामचंद्र बळवंत गव्हाणकर यांचेबरोबर ते प्रथम शिरडीस गेले व बाबांची धूळभेट घेतली. नंतर ते मशिदीत दर्शनास गेले असता बाबांनी त्यांना त्यांच्या मातोश्रींनी केलेल्या पूर्वीच्या नवसाची आठवण करून देऊन तो फेडून घेतला. भेटीच्या पहिल्याच दिवशी बाबांनी अण्णांच्या तोंडात स्वहस्ते केळे भरविले. भेटीच्या पाचव्या दिवशी मशिदीत धुनी शेजारी बाबांच्या हातापायाच्या पट्ट्या सोडण्याचे काम चालू होते, तितक्यात समोर छोट्या केशवला बघून बाबांनी त्यांस आपल्याजवळ बोलावून त्यांच्या श्रीमुखात एक लगावून दिली, त्यासरशी त्यांच्या डोक्यावरची जरीची टोपी दूर उडाली; व नुकत्याच झालेल्या मौंजी बंधनामुळे डोक्यावर राखलेल्या शेंडीला धरून त्यांचे कपाळ आपल्या पायावर जोराने आपटले. एवढे झाल्यावर बाबांनी त्यांचेकडे दोन पैसे मागितले. जवळच उभ्या असलेल्या 'शाम्या'ने छोट्या केशवचा

उजवा हात ओढून तो बाबांच्या हाती दिला व 'दिया' असे म्हटले. बाबांनी ते दोन पैसे स्वतःच्या कफनीच्या उजव्या खिशात कोंबले व त्या प्रसंगाची आठवण म्हणून ती कफनीच नंतर त्यांच्या स्वाधीन केली. ती पवित्र कफनी अण्णांनी सांभाळून ठेवली आहे व ती त्यांच्या कुर्ला येथील निवासस्थानी पहावयास सापडते. १९५० ते ५५ या काळात डॉ. गव्हाणकर तत्कालीन शिरडी संस्थानचे अध्यक्ष होते, व त्यांच्याच कारकिर्दीत शिरडी समाधीमंदिरातील श्रीबाबांचा पुतळा बसविला गेला आहे. १९४८ सालापासून श्रीसाईलीलेचे संपादन कार्य त्यांनी केले व ते १९५६ सालापर्यंत. 'शिलधी' 'शिरडीचे साईबाबा' व 'साईबाबा हाच चमत्कार' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. जून १९७५ मधे ते काही काळ परदेशात जाऊन श्रीसाईंचा प्रचार करून आले होते.

☆


# * श्रीसाईलीला *

## सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७९

* भगवान श्रीसाईबाबांच्या जगभर पसरलेल्या असंख्य साई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयीच्या विविध अनुभवांनी अगदी गच्च असा सुंदर संग्राह्य वाचनीय अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

* श्रीसाईभक्तांनी आपापले नवे, ताजे श्रीबाबांच्या बद्दलचे अनुभव कागदाच्या एकाच बाजूस थोडक्यात सुवाच्य लिहून ते **२० ऑगस्ट १९७९** पर्यंत संपादक श्री साईलीला, 'साईनिकेतन,' ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०० ०१४ या पत्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

प्रसिद्धीची तारीख १५ ऑक्टोबर १९७९

**मुखपृष्ठावर** बाबांचे मनोहर चित्र **किंमत सव्वा रुपया**

# मराठीतील नामवंत साहित्यिक

## श्री. गोपीनाथ उर्फ नानासाहेब तळवलकर लिहितात—

● पूज्य साईबाबांना भेटलो त्यावेळी मी १०–११ वर्षांचा असेन. माझे वडील त्यावेळी कोपरगाव तालुक्यात ओव्हरसिअर होते. आम्ही बैलगाडीने शिर्डीला गेलो. त्यांची समाधि तयार झालेली होती.

आम्ही आत गेलो तेव्हा बाबा शतपावली करून नुकतेच येत होते. ते स्वस्थानावर बसले तेव्हा वडिलांनी सांगितल्यावरून मी पुढे होऊन पाया पडलो व नारळ ठेवला. तेव्हा बाबा रागावल्यासारखे ओरडले. शब्द आता मला आठवत नाहीत. पण मी घाबरलो, अगदी रडण्याच्या बेतात आलो. माझ्या आई-वडिलांनाहि विचित्र वाटले. पण मग तेथचे जाणते लोक पुढे होऊन वडिलांना म्हणाले, 'बाबा बहुधा मौन मोडत नाहीत. ते जेव्हा रागावून बोलतात तेव्हा त्यांचा तो कृपा प्रसाद असतो. या मुलाचे कल्याण होणार आहे हे बाबांच्या रागावण्यावरून लक्षात ठेवा.' आम्हाला बरे वाटले.

बाबा फोटोत दिसतात तसेच हुबेहूब होते. मला अगदी काल दर्शन झाल्या-प्रमाणे आठवते. त्यांचा जराजर्जर चेहरा तेजस्वी दिसे. या जगाहून वेगळा (other worldly) भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. मला वाटते त्याच वर्षी ते समाधिस्थ झाले. आम्ही पुण्याला आलो तेव्हा वृत्तपत्रात ते वाचले. पुढे बाबाजान व मेहेरबाबा यांच्याहि दर्शनाचा योग आला. आपल्या जीवनात जे काही अल्पस्वल्प यश, मंगल, हितकारक आहे ते याच साक्षात्कारी पुरुषांच्या प्रसादामुळे आहे.

— श्री. गोपीनाथ तळवलकर
नातूबाग, पुणे ३०

★

# श्रीसाईबाबांचे चक्षुर्वैसत्यम् दर्शन घेतलेल्या श्रीमंत अनुताई वहिनीसाहेब घोरपडे, इचलकरंजीकर



"निर्मळ प्रभा"
भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर ३

● माझे वयाचे ७ वे वर्षी मी प्रथम श्रीसाईबाबांना पाहिले. माझे वडील श्री. रा. रा. गोविंद वासुदेव कानिटकर हे येवल्यास जज्ज होते. त्या वेळी त्यांना इतर कोर्टें तपासणीस जावे लागत असे. एकदा कोपरगावचे कोर्टाचे तपासणीस जाणेसाठी ते त्यांचे ऑफिसच्या मंडळीना घेऊन निघाले होते, तेव्हा आमच्या मातुःश्री कै. तो. श्री. काशीबाई कानिटकर ह्या आम्हा मुलांना घेऊन त्यांचेबरोबरच जाणेस निघाल्या. त्यावेळी प्रवासाला बैलगाड्या हीच वाहने असत. संध्याकाळी रात्री प्रवास करून दिवसा मुक्काम करून कोर्ट तपासायचे असा कार्यक्रम असे. कोपरगावचे कोर्ट तपासणेसाठी आमचा मुक्काम तेथे असताना तेथील लोकानी आमचे वडिलांना सांगितले की नदीपलिकडेच शिर्डी ह्या गावात एक फार मोठे मुसलमान साधु आहेत. तेव्हा आलाच आहात तर त्यांचे दर्शन घेऊन जा! माझ्या वडिलांना व मातुश्रींना साधु सत्पुरुषांचे दर्शन व्हावे व काही अध्यात्म विषयांचे ऐकायला मिळावे असे फार वाटे. तेव्हा हे वृत्त ऐकताच त्यांनी लगेच शिर्डीस एक दिवस जाऊन येणेचे ठरविले, व संध्याकाळचे मुक्कामास शिर्डीस गेलो. आम्ही सर्व तेथे मुलांचे शाळेत उतरून संध्याकाळी त्याकाळी फारसे प्रसिद्धीस न आलेले सिद्ध पुरुष श्रीसाईबाबा यांचे दर्शनास मशिदीत (ती आज द्वारकामाई ह्या नावे प्रसिद्ध आहे) गेलो. एक लहानशी मशीद, पुढे मोठे अंगण, मशिदीतील जमीनीस खड्डे पडलेले, डाव्या बाजूस धुनी पेटलेली, व उजव्या बाजूच्या कठड्यापाशी एक भव्य, उंच मूर्ती, एक लांब पायघोळ कफनी घालून व डोक्याला एक पांढरा रुमाल गुंडाळून, एका फाटक्या पोत्यावर चिलीम ओढीत बसलेली असे दृश्य आम्हाला दिसले. त्यावेळी चोवीस तास अखंड पेटत असलेल्या धुनीला लागणारी लाकडे खरेदी करण्यासाठी दर्शनास येणाऱ्या मंडळीचेकडे श्रीबाबा पैसे मागत असत, असे कुणीतरी आमच्या

मातुःश्रींना सांगितले म्हणून त्यांनी आम्हा मुलांचेसकट सर्वांचे हातावर श्रीबाबांचे पुढे ठेवणेस दोन आणे चार आणे जे हाताला आले ते नाणे दिले. आम्ही श्रीबाबांचे हातात ते देऊन पायावर डोके ठेवून दर्शन घेतले व घरी आलो. आमच्या बरोबर कोर्टाची कारकून मंडळीही होती. रात्री सर्व मोठी माणसे गप्पा मारीत बसली असताना आमचे वडील म्हणाले, 'हे कसले साधु? लोकांचेकडे पैसे मागतात, शिव्या देतात.' मला नाही फारसा आदर वाटत, पण इतरांनी आपण पाहिलेल्या व ऐकलेल्या चमत्कारांच्या खूप गोष्टी सांगितल्या. दुसरे दिवशी आम्हाला परत जायचे होते म्हणून सकाळी सर्व आटोपून जाणेपूर्वी दर्शन घेणेस मशिदीत गेलो व त्याहीवेळी सर्वांनी बाबांचेपुढे पैसे ठेवले, व अखेर जेव्हा आमचे वडील श्री तात्यासाहेब व मातुःश्री दर्शनास गेले तेव्हा श्रीबाबांनी त्यांचे हातावर आम्ही जेवढे पैसे त्यांचे पुढे ठेवले होते दोन वेळा, तेवढे सर्व परत दिले. व तोंडाने 'हा कसला साधु, पैसे मागतो, शिव्या देतो' ही रात्री शाळेचे इमारतीत आमच्या वडिलांनी उच्चारलेली वाक्ये उच्चारीतच पैसे परत दिले! आमच्या मातुःश्रींना वाईट वाटले व त्या म्हणाल्या, 'बाबा, पैसे परत का करता? धुनीसाठी लाकडे घ्या.' तेव्हा श्रीबाबानी सांगितले, 'राहू देत ते पैसे तुझ्याजवळ ठेव' मग नाईलाजाने ते पैसे परत घेतले. आमच्या मातुःश्रीनी ते सर्व पैसे श्रीबाबांचा प्रसाद म्हणून एका रेशमी पिशवीत घालून देवांचे देव्हाऱ्यात ठेवले. मात्र आमच्या वडिलांना बाबांनी हे पटविले की आपण सर्व संचारी असून सर्वांचे विचार व उच्चार आपणास समजतात! त्यानंतर अनेक वेळा आम्ही श्रीसाईबाबांचे दर्शनास गेलो व प्रत्येक-वेळी त्यांनी काही ना काही चमत्कार दाखविले. श्रीसाईबाबांचे दर्शनास येणाऱ्या लोकाना ते आपल्या हाताने धुनीतील राख देत व कपाळास लावीत. त्या राखेलाच 'उदी' म्हणत असत, व ही अतिशय पवित्र उदी अजूनही भक्तांचे रोग परिहार करीत आहे व भक्तांचे संग्रहात एक अमोलिक ठेवा होऊन बसली आहे.

मी त्या काळी फार लहान होते तरीही श्रीसाईबाबांच्या काही आठवणी कायम स्मृतीत आहेत. त्या काळी मी व माझेपेक्षा मोठा असलेला माझा भाऊ असे गोव-राने आजारी पडले. माझा गोवर लवकर बाहेर पडला व मला तापही फार नव्हता, परंतु माझ्या बंधूचा गोवरही मोठा होता व त्यांना तापही फार होता व तापातच घुणा फुटून नाकातून बरेच रक्त गेले, त्यामुळे वडील मंडळीना फार काळजी वाटू लागली. 'निर्वाणीचा पांडुरंग' तसे संकटात आमचे 'साईबाबा' आले होते. आमच्या मातुःश्रींची त्यांचेवर फार श्रद्धा जडली होती व त्या आमचे आजारीपणात दररोज आम्हा दोघा भावंडाना श्रीसाईबाबांची उदी लावीत असत. आमचे बंधुना बरे वाटू लागले, पण तिकडे शिर्डीमध्ये श्रीसाईबाबा दररोज सभोवारच्या लोकांना म्हणत असत 'अरे कुणीतरी गाडी आणारे, मला येवल्यास जायचे आहे. आई बोलावीत

आहे' ! जे श्रीसाईबाबा शिर्डीतून कधीच बाहेर गेले नाहीत ते येवले ह्या गावी कशाला जातील ? पण लोकांनी ओळखले की येवल्यास कोणातरी संकटग्रस्त भक्तांनी श्रीबाबांची आठवण केली असावी व म्हणूनच बाबा सारखे 'येवल्यास जायचे आहे' म्हणतात. आम्ही दोघे भावंडे पूर्ण बरी झाल्यावर एके दिवशी सकाळी एक फकीर 'अलख' म्हणून भिक्षा मागणेस येऊन उभा राहिला. मी तेथेच खेळत होते. पहाऱ्यावर शिपाई होता त्याने फकिरास सांगितले, 'बाबा, डबा मोकळा झाला आहे. बाजरी काढायची आहे. जरा वेळाने या' (एका पत्र्याचे डब्यात भिक्षेकऱ्यांना भिक्षा घालणेसाठी बाजरी ठेवलेली असे व पहाऱ्यावरचा शिपाई भिक्षेकऱ्यांना भिक्षा घालीत असे) तो फकीर 'अच्छा' म्हणून गेला व पुन्हा थोड्याच वेळात परत आला. मधल्या वेळात शिपायाने बाजरी काढून आणली नव्हतीच ! आम्ही माडीवर रहात होतो व ह्या सर्व घडामोडी खाली पहाऱ्यात चालल्या होत्या त्यामुळे घरच्या मंडळींना काहीच माहिती नव्हती. मी एकटीच खाली होते. शिपाई गंगारामने पुन्हा तसेच सांगताच, तो फकीर हसला व म्हणाला 'डब्यात काय असेल ते घाल, पुन्हा कुठे येऊ' असे म्हणताच गंगारामने डबा हातात घेऊन हालवून दाखविला व म्हणाला 'खराच रिकामा आहे, बाबा.' तरीही फकीर म्हणाला 'चार दाणे असतील ते मला पुरेत.' तेव्हा गंगारामने डब्यात हात घालून दोन चिमटया बाजरी फकिराचे पुढे केली. फकिराचे खांद्यावर एक हिरवा रुमाल होता, तो त्याने आपल्या दोन हातांचे ओंजळीत धरून भिक्षा घेतली, व दोन्ही हातात ते फडके झाकले व हसून ओंजळ उघडली तर त्यात ओंजळ भरून बाजरी होती. गंगारामकडे पाहून तो फकीर म्हणाला 'बघ, पुष्कळ आहे भिक्षा' व हसून आल्या वाटेने परत गेला ! हा सर्व चमत्कार पाहून माझे बाल मन आश्चर्याने चकित झाले व आईला व भावंडांना आपण एक गम्मत पाहिली हे सांगण्यासाठी मी पळतच माडीवर गेले ! माझे तोंडून ही हकीगत ऐकताच मातुःश्रींनी गंगारामला त्या फकीराला परत बोलावून आणणेस सांगितले व बाजरी का नेली नाही म्हणून त्या रागावल्या ! श्रीसाईबाबाच त्या फकीराचे रूपाने येऊन आमचे वरची भिक्षा घेऊन आशीर्वाद देऊन गेले अशी आमच्या मातुःश्रींची खात्री होती. फकीरास परत शोधून आणणेसाठी गेलेले नोकर तो कुठेच सापडत नाही म्हणून परत आले व सांगू लागले की आमचे दारातून बाहेर पडताच तो अदृश्यच झाला ! नंतर जेव्हा आम्ही शिर्डीस गेलो त्यावेळी श्रीबाबांनी 'आई मी तुझे घरी येऊन गेलो' असे म्हणून दाखविले. आम्ही जेव्हा शिरडीस जात असू तेव्हा श्रीसाईबाबांच्या आवडीचे पदार्थ नेत असू. त्यांना कोवळ्या आंब्याचे लोणचे, आंबे, द्राक्षे, शिरा हे जिन्नस आवडत. एकदा आमच्या मातुःश्रींनी कणकीच्या दशम्या व कोवळ्या आंब्याचे लोणचे असे नेले होते. मशिदीत बऱ्याच लोकांची गर्दी होती म्हणून दशम्यांचा डबा मातुःश्रींनी खांबाचे आड ठेवला. दर्शन घेऊन आम्ही सर्व बसलो असताना बाबा आमचे मातुः-

श्रींना म्हणाले, आई मला काय आणलस ? लपवून ठेवलंस ? काढ की काय आणलं आहेस ते ! असे म्हणून डब्यातील दशमी लोणचे मोठ्या प्रेमाने घेऊन आपल्या जेवणाचे परळात झाकून ठेवले ! एकदा आमचे घरी नाशिकच्या द्राक्षांचे एक मोठे पार्सल आले होते व आम्ही शिर्डीस जाणेसच निघालो होतो, म्हणून ते पार्सल बरोबरच घेतले, श्रीबाबांना द्राक्षे अर्पण करावीत म्हणून ! मशिदीत दर्शनास गेल्यावर मातुःश्रीनी मोठे मोठे द्राक्षांचे घड श्रीबाबांचे परळात ठेवले. माझी वडील बहीण (१९।२० वर्षे वयाची) जवळच बसली होती. तिचे मनात विचार आला की 'वहिनीने (आम्ही मातुःश्रीना वहिनी म्हणत होतो) सर्व चांगली द्राक्षे बाबांचे परळात घातली, ते आता ती सगळी आलेल्या लोकांनाच वाटून टाकणार! (श्रीबाबांना काही दिले की ते, ते सर्वांना वाटून टाकीत असत) त्यांना इतकीं दिली नसती तर आपल्या मुलांच्या तरी मुखात पडली असती !' इकडे हा विचार तिचे मनात येतो न येतो तोच बाबांनी सर्वच मोठे द्राक्षाचे घड हातात घेऊन तोंडाने 'तुझीच लेकरंबाळं खाऊ देत, कशाला सगळ्यांना वाटीत बसायचे ?' असे म्हणून मातुःश्रीना परत दिले. ते पाहून माझ्या बहिणीला फार दुःख झाले व घरी आल्यावर तिने मातुःश्रीना आपले स्वार्थी विचार सांगितले व 'चुकले माझे' म्हणाली. श्रीसाईबाबा कधी कधी फार रागावून शिव्याही देत असे लोक सांगत. परंतु आम्ही १९०७ ते १९०९ ह्या २ वर्षात अनेक वेळा शिर्डीला त्यांचे दर्शनास गेलो पण आमचे देखत ते कधीच रागावले नाहीत, ते आमचेशी फारच प्रेमाने वागत. मशिदीत नेहमी गर्दी असे व जमिनीवरच खेड्यापाड्यातले लोक जेथे बसत असत तेथेच आम्हीही बसत असू. एकदा आम्ही बरेचजण शिरडीस गेलो होतो. माझे आई-वडील, दोघे बंधू दोघे मेहुणे व त्यांचे एक मित्र इतकी मंडळी होतो. त्यावेळी शिर्डीचे यात्रेत आमचे वडिलांचे खेरीज सर्व मोठी मंडळी थिऑसॉफिस्ट होती. थिऑसॉफिस्ट् मंडळीचा सिद्ध पुरुषांचेवर-(ज्यांना मास्टर्स म्हणतात त्यांचेवर) विश्वास आहे. व जे त्या पदवीला पोचतात ते सर्वज्ञानी असतात. त्यांना ह्या दृश्य जगात किंवा सूक्ष्म सृष्टीत काहीच अज्ञात नसते असाही विश्वास असतो. मनुष्य कोणत्याही धर्माचा अगर पंथाचा असो, सिद्धावस्थेला गेल्यावर त्यांचा दर्जा एकच व तो महान श्रेष्ठ असा असतो अशी आम्हा थिऑसॉफिस्ट मंडळींची श्रद्धा आहे. श्रीसाईबाबा हे सिद्ध पुरुष आहेत अशी सर्वांची खात्री पटली नव्हती, परंतु ते फार श्रेष्ठ दर्जाचे सत्पुरुष असावेत असे मात्र सर्वांना वाटे ! एका अगदी लहान खेड्यातील, एका मशिदीत रहाणारा व मुसलमानी फकिरासारखा पोषाख करणारा एक अवलिया; अशीच सर्वांची श्रीसाईबाबांचेबद्दल कल्पना होती. त्यांना मराठी व मुसलमानीशिवाय इतर भाषाही येत नसाव्यात अशीच सर्वांची समजूत होती. माझे मेहुणे श्री. टिळक ह्यांना वाटले की श्रीसाईबाबा जर खरे सिद्ध पुरुष असतील तर त्यांना कोणत्याही भाषेतील आत्मज्ञान समजावे, पाहू या त्यांना इंग्रजी समजते का, अशा विचाराने ते


थिऑसॉफिकल सोसायटीने त्यावेळी नुक्तेच प्रसिद्ध केलेले 'मास्टर्स' (सिद्ध पुरुष) बद्दलचे पुस्तक घेऊन मशिदीत गेले. श्रीबाबा सर्वकाळ मशिदीतील कठड्यापाशी बसलेले असत. फक्त सकाळी व संध्याकाळी गावाबाहेर एक बाग व एक ओढा होता तेथे जाऊन येत असत. श्री. रामभाऊ टिळकांनी बाबांना नमस्कार केला व त्यांचे ते जवळ बसले. श्रीबाबांनी जरा वेळ त्यांचेकडे टक लावून पहात चिलमीचे झुरके ओढले. श्रीबाबांची ती एक पद्धतच होती. चिलीम ओढीत असताना येणाऱ्यांचेकडे स्थिर दृष्टीने पहायचे व मग सावकाश बोलायचे. श्री. टिळकांना श्रीबाबांनी विचारले, 'काय आणले आहेस?' तेव्हा त्यांनी हातातले पुस्तक दाखविले. श्रीबाबांनी ते पुस्तक हातात घेऊन पाहिले व परत देऊन 'अमुक पान काढ व मोठ्याने वाचून दाखव' असे त्यांना सांगितले. ती रामभाऊनी श्रीबाबांनी सांगितलेले पान काढून वाचणेस सुरुवात केली. श्री बाबा एकाग्रतेने ऐकत बसले होते. सबंध प्रकरण 'मास्टर्स' अगः सिद्ध पुरुष यांचे बद्दलचेच होते. श्री. रामभाऊना श्रीबाबांनी काही सूचक प्रश्न विचारले व त्या वरून तो विषय म्हणजे त्यांचे हाताचा मळ आहे व ते खरे सिद्ध पुरुष आहेत हे श्री. रामभाऊना पटले. इंग्रजी ग्रंथातील विषय श्रीबाबाना समजतो किंवा नाही हे पाहून श्रीबाबांची व त्यांना एक मोठे सिद्ध पुरुष समजणाऱ्यांची फजिती करण्याचे विचाराने गेलेल्या श्री. रामभाऊंचीच अशी फजिती झाली! जो मनुष्य ज्या धर्माचा, ज्या पंथाचा असेल त्याला त्याच्याच मार्गाने जाणेस श्रीबाबा उत्तेजन देत असत. थिऑसॉफिस्ट लोकांनी त्याच संस्थेत राहून आपले साध्य मिळवावे असेच त्यांचे सांगणे असे. कित्येकांना 'राम, राम' म्हण, 'गीता' वाच, 'भागवत वाच,' असे सांगत. भगवद्गीतेतील एखादा श्लोक मोठ्याने वाचणेस सांगून त्याचे उत्तम विवरण करीत असे आमची वडील मंडळी सांगत असत. श्रीसाईबाबा, दर्शनास येणाऱ्यांकडे कित्येक वेळी अगदी निरखून पहात असत. एखादे वेळी दर्शनास आलेल्या माणसांचे अनुभवच गोष्टीच्या रूपाने सांगत. व शेकडो मैलावर घडलेल्या घटना श्रीबाबांना कशा अचूक सांगता येतात ह्याचे आश्चर्य वाटे. त्यावेळीही श्रीबाबांचे चमत्कार अनेकांचे अनुभवास आले. येवल्याचेच (जेथे आम्ही त्या काळात रहात होतो) एक मामलेदार श्रीबाबांचे दर्शनास गेले होते. त्यांचे मनात श्रीबाबा सिद्ध पुरुष आहेत का नाहीत ह्याबद्दल शंकाच होती, व 'पाहू या एकदा जाऊन' म्हणून शिरडीस गेले. साधुसत्पुरुष, देव व राजा यांचे दर्शनास मुक्त हस्ताने जायचे नाही अशी भारतीयांची परंपरा आहे. त्या परंपरेला धरून मामलेदारांनी श्रीबाबांचेपुढे खडीसाखर व नारळ ठेवून दर्शन घेतले व बसले समोर. एका भाविक भक्ताने श्रीबाबांचे पुढे कापूराची वडी पेटवून ठेवलेली होती. कोणी काही दिले तरी श्रीबाबा ते सर्व सभोवताली बसलेल्या लोकांना वाटून टाकीत असत. त्याप्रमाणे मामलेदारानी ठेवलेल्या खडीसाखरेचा पुडा सोडून सर्वांचे हातावर खडीसाखरेचे खडे दिले व आपल्यापुढे जळणाऱ्या कापराचे वडीवर खडीसाख-

रेचें खडे पेटवून (५।६) ओळीने लावले व ते ५।६ खडे कापरासारखे पेटले!! हे दृश्य पाहून मामलेदार मनात समजले की श्रीसाईबाबांचेबद्दल आपल्या मनात जो संशय आला होता त्याचे निराकरण करणेसाठीच श्रीबाबांनी अगदी सहज एक चमत्कार दाखविला. इतके होऊनही घरी आल्यावर मामलेदारांना शंका आली की आपण आणलेल्या खडीसाखरेत कापराचा अंश होता का काय? म्हणून श्रीबाबांनी त्यांना दिलेले खडीसाखरेचे खडे पेटवून पहाणेचा खूप वेळ प्रयत्न केला! पण साध्या माणसाचे अंगी खडीसाखर कापरासारखी पेटविणेचे सामर्थ्य आहे का? मामलेदारांची खात्री झाली की श्रीसाईबाबांचे ठिकाणी काही विशेष सामर्थ्य आहे!! श्रीबाबांची शिकवण अगदी साधी होती. 'सर्व प्राणी परमेश्वराचेच अंश आहेत व तोच सर्वत्र भरून राहिलेला आहे ही जाणीव ठेवून, कुणाशीही वैर न करिता रहावे. भुकेलेल्या जीवांना अन्न, निराश्रितास आधार देऊन, सदाचरणाने वागून, मिळेल त्यात समाधान मानून सर्वांवर प्रेम करावे व श्रेष्ठांनी दाखविलेल्या सन्मार्गाने जीवितयात्रा करावी. श्रीसाईबाबांच्या धुनीतील 'उदी' अजूनही लोकांना त्यांच्या संकटातून वाचविते व श्रीसाईबाबांचे अस्तित्व दर्शविते. श्रीसाईंचे चरणी शतशः प्रणाम!

☆ ☆ ☆

### श्रीबाबांकडून अनेकदा प्रसाद घेतलेले

## अहमदनगरचे श्री. चितांबर बंधू



● श्री. अनंत जयदेव चितांबर, सेवानिवृत्त असिस्टंट रजिस्ट्रार, नगर हे श्रीबाबांचे सहवासासंबंधी सांगतात—

माझे वडील कै. श्री. जयदेवराव चितांबर शिरडी येथे बाबा असताना १९१२ ते १९२८ पर्यंत १४ वर्षे प्राथमिक शाळेचे हेडमास्तर होते. बाबांनी १९१८ साली विजयादशमीस देह ठेवला त्यावेळी मी शिरडीस होतो व वय माझे आठ वर्षांचे होते. मी नेहमी त्यांच्या द्वारकामाईत जाऊन त्यांच्या पायावर मस्तक ठेवून दर्शन घेणे, तेथील आरत्यांना हजर राहाणे करत असे. बाबा नेहमी गावात हिंडत फिरत, भिक्षेसाठी जात इ. गोष्टी मी पहात असे. भक्तांच्या मेळाव्यात त्यांचे उठणे, बसणे, चिलीम ओढणे इ. गोष्टी आजही माझ्या डोळ्यासमोर आहेत. बाबांच्या सहवासातले भक्त, काकासाहेब दीक्षित, गोपाळराव गुंड, नानासाहेब चांदोरकर, तात्या कोते

पाटील, माधवराव देशपांडे, बापूसाहेब जोग, अब्दुलबाबा, दासगणू इत्यादिना समक्ष पहाण्याचे भाग्य मला लाभले आहे.

आमची आई बाबांचे रोज दर्शन घेई व त्यांच्या चरणावर हळद कुंकू वाहात असे. एकदा तिने बाबांना विचारले, बाबा हे जे मी करते तुम्हाला आवडते का? तेव्हा बाबा म्हणाले, भक्तीने काही वाहिले तरी ते मला आवडते. बाबा आईकडे दक्षिणा मागत तेव्हा आई चार आणे दक्षिणा देत असे. माझ्या वडिलांची पण बाबांवर भारी श्रद्धा. एकदा बाबांनी वडिलांच्या डोक्यात सोटा हाणला. जखमेतून रक्त आले. उदीने ते थांबले. जखम बरी झाली व १५ दिवसांनी १५ रु. पगाराची बढती झाल्याचा त्यांना हुकूम आला. बाबा रागावले की तो महान प्रसाद मानीत व त्यांच्या रागावण्याचे फल म्हणजे त्या माणसाचा उत्कर्ष असा आमचा अनुभव आहे. खरोखरच श्रीसाईबाबा सर्वलोकमहेश्वर असे श्रेष्ठ संत होऊन गेले असे मला वाटते.

---

# श्री. ग. ज. चितांबर



'आकांक्षा' सर्वोदय हौसिंग सोसायटी,
मु. पोस्ट–अहमदनगर

● माझा जन्म २२-८-१८९१ चा शिरडीचा. अगदी पहिल्या अडीच वर्षापर्यंतचे मला काही सांगता येत नाही. परंतु वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी मला समजू लागले होते. बाबांच्या जवळ लहान मुले आजोबाजवळ बसतात तशा प्रकारे मी दिवसाचा खूपच वेळ बसत असे. लहान नातवंडे घरात आजोबांशी वागतात तसाच मी वागे. दुपारची आरती झाली की बाबा मशिदीतील पायरीवर उभे राहून नैवेद्याची सर्व ताटे सर्व उपस्थितांना वाटून टाकीत. सर्व अन्न गोरगरीबाना ते स्वतः देत. एका हातात बर्फीच्या मध्यम आकाराच्या मुदी असत. त्यातील एक छोटी मूद बाबांच्या हातून सर्वप्रथम मला मिळे. मला खूप आनंद वाटे. मी ती घरी आईजवळ देई. आम्ही सर्वजण थोडाथोडा प्रसाद त्यातला घेत असू व बाकीचा फडक्यात

बांधून ठेवला जाई. परगावचे कुणी भक्त बाबांच्या दर्शनास येत त्यांना आरतीच्या वेळचा प्रसाद हवा असल्यास ते आमच्या घरी येत व त्यांना त्यातला प्रसाद माझी आई देत असे. वडील शाळेला गेलेले असत.

एके दिवशी रात्री मी ८–९ वाजेतोपर्यंत बाबांचे जवळ बसलो होतो. एवढ्यात बाबांना काय वाटले कुणास ठाऊक बाबांनी रस्त्याने जाणाऱ्या एका माणसास हाक मारली व मला घरी पोचवण्यास सांगितले. एके दिवशी तर माझी आई मला नेण्यास आली. मी लौकर निघेना म्हणून तिने मला एक रपाटा मारला. ती तेवढ्यात ४-५ पावले गेली असेल तोच बाबांनी तिला सांगितले, हे पहा हा मागल्या जन्मीचा तुझा बाप आहे आणि माझा मित्र आहे याला पुन्हा मारू नकोस.

बाबा पंचत्वात विलीन झाले त्यावेळची त्यांची अंत्ययात्रा मी पाहिली आहे. चार चाकाच्या वाहनावरून अर्धवर्तुळाकार आच्छादन घालून त्यांचा देह मिरवणूकीने मशिदीतून (द्वारकामाई), आमच्या घरावरून, गावातून वळसा घालून समाधी मंदिराकडे नेताना मी पाहिला आहे. त्यावेळी ते देऊळ पूर्णपणे बांधून झालेले नव्हते. त्याचे बांधकाम नंतर होत गेलेले मी पाहिले आहे. साईबाबा व तत्कालीन भक्त यांनी माझ्या जीवनाची जडण घडण केली आहे. मी पुढे शिकलो सवरलो. नगरमध्ये शिक्षण प्रचार खास करून स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. सरकारने माझा पारितोषिक देऊन गौरव केला ही सारी मला बाबांनी दिलेली प्रेरणा व त्यांचाच आशिर्वाद असे मी समजतो.

---


## "योगसिद्धी", साईबाबा विशेषांक

[संपादक– श्री. स. म. खाडिलकर, १२८६ सदाशिव पेठ, पुणे ३०. किंमत ४ रु.] पुण्याहून नव्यानेच निघालेल्या या मासिकाने जुलैचा अंक भगवान श्रीसाईबाबा विशेषांक हा प्रसिद्ध केला असून त्यामधे श्रीसाई शिर्डी संस्थानचा सचित्र परिचय, श्रीसाईबाबांच्या अगाध लीला हे श्री. सदानंद चेंदवणकर, बोले समाधी...हाले समाधी...श्री. ग. रा. टिकेकर, साक्षात्कारी संत श्रीसाईबाबा डॉ. सौ. चारुशीला गुप्ते, श्रीसाईबाबा एक अवतारी भगवान श्री. भाऊसाहेब सप्रे, इ. चे वाचनीय लेख आहेत. प्रा. र. श्री. पुजारी यांनी तीन तासांच्या पारायणास उपयुक्त असलेल्या पोथीचे १ ते ५ अध्याय यामधे आहेत. भक्तांना ते संग्राह्य असेच वाटतील. मुखपृष्ठावर श्रीसाईबाबांचे मनोहर चित्र आहे.

म्हाळसापतींचे चिरंजीव

# श्री. मार्तंडमहाराज भगत



● शिरडीच्या खंडोबाच्या देवळात श्रीबाबांचे प्रथम स्वागत त्या देवळाचे पुजारी म्हाळसापती महाराजानी 'आओ साईबाबा' या शब्दात केले; त्या म्हाळसापतींचे वयोवृद्ध चिरंजीव मार्तंडमहाराज आज हयात आहेत व त्यांचे वय आज सुमारे ९० वर्षांचे आहे. त्यांचा जन्म १८९० साली गोकुळ अष्टमीस झाला. त्या आधी म्हाळसापतींना पुत्ररत्न नव्हते. चार मुली होत्या. श्रीसाईनाथांच्या आशिर्वादाने म्हाळसापतीना या पुत्राचा लाभ झाला व त्यांना वयाच्या २५ वर्षापर्यंत जपण्यास बाबांनी म्हाळसापतीना सांगितले. बाळपणासूनच मार्तंडाचा ओढा भक्तिमार्गाकडे होता. श्रीसाईनाथांच्या नित्य सहवासामुळे त्यांची त्या मार्गातील प्रगती झपाट्याने झाली. लहानपणापासून बालसुलभ कुतुहलाने मार्तंडभगत आपल्या वडिलांबरोबर नेहमी मशिदीत जात व तिथे आपल्या वाट्यास येणारी लहान सहान कामे हौसेने करीत. बाबांना पानविडा देणे. प्यावयास पाणी देणे. दात कोरण्यास काड्या आणून देणे. त्यांच्याबरोबर खेळणे हा त्यांचा आवडता दिनक्रम होता. १९१० साली मार्तंडांचे लग्न झाले. मुलगी श्रीबाबांनीच पसंत केली होती. लग्नाच्या गावाहून वरात परतल्यावर मंडळी मशिदीत दर्शनास गेली असता 'आपण लग्नाला हजर होतो' असे उद्गार बाबांनी काढले.

श्रीमार्तंड हे श्रीसाईबाबा व आपले वडील यांना गुरुस्थानी मानतात. त्यांच्या श्री बाबांनी वापरलेल्या वस्तु व प्रसाद म्हणून दिलेले तीन रु. देव्हाऱ्यात नित्य पूजेत आहेत. मार्तंड भगत ही जुन्या शिरडीतील व बाबांना पाहिलेली एक आदरणीय व्यक्ती म्हणून ओळखली जाते. त्यांचेजवळ बाबांच्या असंख्य आठवणी आहेत. या वयातही ते नित्य नेमाने खंडोबाची, देवळात जाऊन पूजा करीत असतात. त्यांची प्रकृती छान आहे.

❖❖❖

### श्रीबाबांच्या बरोबर फिरलेले भाग्यवंत

## कुर्ल्याचे श्री. आत्माराम शिरोडकर

सत्यजीवन को. ऑ. हौसिंग सोसायटी,
ब्लॉक नं. ३, प्लॉट नं. ६
लालबहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला, मुं. ७०

माझा जन्म २९-१०-१९०९ माझे आई वडील १९१४ व १९१६ साली प्रथम शिर्डीला जाऊन आले. माझा नंबर आईबरोबर १९१८ श्रावण महिन्यात लागला व श्रीबाबांचे दर्शन झाले. ९ वर्षांचा असताना प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ झाला. शिर्डीस ३ दिवस होतो. सकाळ, दुपार, सायंकाळ दर्शन मिळत असे. दुपारी ४ नंतर बाबांच्या पायांना स्पर्श करावयास मिळत असे. लेंडी बागेत श्रीसाईबरोबर फिरायलाही गेलो आहे. गुरुवारी ८/९ चे सुमारास पायी श्रीसाईबरोबर चावडीतही गेलेलो आहे. दुपारी आरतीचे वेळीही दर्शन होई.

श्रीबाबांनी स्वहस्ताने प्रसाद म्हणून दिलेली उदी अत्यंत जपून ठेवलेली आहे.

माझ्या पाठोपाठ लगेचच माझे बंधू श्री. वासुदेव व श्री. रामकृष्ण हेही शिर्डीला जाऊन आले. पण दुर्दैवाने त्यावेळी नुकतेच बाबा समाधिस्थ झाले होते.

आम्हां सर्वांना अजूनपर्यंत बाबांचे घडोघडी अनुभव येत असतात.

❖❖❖

### बाबा भक्तांसाठी चमत्कार करतात

# अंधेरीच्या सौ. शांताताई नावलकर यांनी

## बाबांचे दर्शन घेतले तेव्हा—

नावलकर बंगला, आझाद लेन, कुर्ला रोड
अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

● मी सौ. शांताबाई खंडेराव नावलकर, रहाणार अंधेरी पूर्व, मुंबई ६९. माहेरचे नाव कु. शांताबाई मुकुंदराव पाटील. वयाच्या दहाव्या वर्षी म्हणजे सन १९१७ मध्ये काकांबरोबर शिर्डीस श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी गेले होते. श्रीसाई-बाबांच्या दर्शनासाठी आम्ही जेव्हा गेलो त्या वेळी बाबांची आरती द्वारकामाईमध्ये चालू होती व बाबा पायरीवर आरतीसाठी उभे होते. त्यांनी भगवी कफनी परीधान केली होती. ते त्यावेळी फारच तेजस्वी स्वरूपात दिसत होते. आरतीच्या वेळी बाबांचा श्यामसुंदर नावाचा घोडा पायरीवर दोन पाय ठेऊन आरतीसाठी उभा होता. आरतीसाठी तो नेहमी असाच उभा रहात असे, असे त्यावेळी समजले. आरती संपल्यावर श्रीबाबांकडे पाठ न करता मागे मागे होत तो निघून गेला. आरतीनंतर बाबांनी स्वतःच्या हातांनी सर्वांना उदी लावली व मला उदी लावून माझ्या डोक्या-वर हात ठेऊन 'कल्याण होईल' असा आशिर्वाद दिला.

खरोखरच बाबांवर श्रद्धा आणि भक्ती ठेवली तर बाबा आपल्या भक्तांसाठी केव्हाही धावून येतात असा माझा अनुभव आहे. आतापर्यंत 'श्रीसाईचरीत' या पोथीचे बरेच वेळा मी सप्ताह केले आहेत. बाबांबद्दल एक अनुभव मी येथे लिहू इच्छीते, तो असा की आमच्या घरातील बंद कपाटातून शंभराच्या तीन नोटांपैकी १ शंभराची नोट दिनांक १ नोव्हेंबर १९४७ रोजी नाहीशी झाली. साहजिकच माझ्या यजमानांनी मला ही गोष्ट दुसरे दिवशी सांगितली व कपाटातील १ शंभराची नोट कमी झाली आहे तेव्हा मी ती घेतली आहे किंवा काय? असे विचारले. मी आश्चर्यचकित झाले. बंद कपाटातून नोट जावी याचे फार आश्चर्य वाटले. घरातसुद्धा लहान मुलांशिवाय पैसे घेण्यासारखे कोणी नव्हते. साहजिकच मला फार वाईट वाटले. मी श्रीबाबांना प्रार्थना केली की, बाबा मी तर नोट घेतली नाही व घरातील बंद कपाटातून १ नोट शंभराची नाहीशी झाली आहे तरी ती कोठे व कशी गेली ते मला माहित नाही. तरी ह्या गोष्टीचा उलगडा लौकरात लौकर करा नाहीतर मला चैन पडणार नाही.

असेच थोडे दिवस गेले. कोठल्याही गोष्टीत चित्त लागत नव्हते. अचानक गुरुवार दिनांक २० नोव्हेम्बर १९४७ रोजी श्रीसाईबाबांसाठी आणलेल्या हाराच्या पुडीमध्ये शंभराची नोट मिळाली ! हार आणणाऱ्या फुलवाल्याकडे चौकशी केली असता आपली शंभराची नोट नसल्याचे त्याने सांगितले. १ नोव्हेम्बर १९४७ रोजी नोट नाहीशी झाली व २० नोव्हेम्बर १९४७ रोजी हाराच्या पुडीत परत मिळाली. बाबा भक्तांसाठी असे चमत्कार करीत असत. हा माझा अनुभव त्यावेळेच्या श्रीसाईलीला मासिकातून प्रसिद्ध झाला होता. साईप्रसाद म्हणून फ्रेममध्ये पूजेला आम्ही ती नोट लावली. आजही आपणास ही नोट आमच्या देव्हाऱ्यामध्ये ठेवलेली आपणास दिसेल. बरेच लोकांना ह्या नोटेच्या अनुभव व दर्शनाने कमालीचे आश्चर्य वाटते व नकळत त्यांचे हात श्रद्धेने बाबांच्या तसबीरीपुढे जोडले जातात.

If you look to me, I will look to you

हे बाबांचे वचन बाबा आपल्या भक्तांसाठी खरे करून दाखवितात यात शंकाच नाही.

श्री सद्गुरू श्रीसाईबाबांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम करून माझा हा स्वानुभव थोडक्यात लिहून पुरा करते.

★ ★ ★

# श्री. नागनाथ गंगाराम कोत्तावार

**श्री. नागनाथ गंगाराम कोत्तावार**
रीटायर्ड मार्केट सुपरींटेंडेंट,
सदर बाजार, हिंगोली.
(जि. परभणी.)

• श्री० दासगणू महाराजांच्या प्रेरणेवरून १९१७ साली आई वडिलांबरोबर मलाही श्री बाबांचे समक्ष दर्शन घडले हे माझे सद्‌भाग्य होय पण माझी श्री बाबांवर तितकी श्रद्धा नव्हती. १९४९ साली माझी बदली वैजापूर (जि. औरंगाबाद) येथे झाली. तेथून श्री क्षेत्र शिर्डी जवळ असल्याकारणाने ह्या मुक्कामी असेपर्यंत मला व घरच्या सर्व लहान थोरांना श्री बाबांच्या दर्शनाचा योग बहुतेक गुरुवारी व उत्सव प्रसंगी घडून आला. तेव्हापासून मी श्री बाबांचे चिंतन करीत असतो. गुरुवारी उपवास करून 'श्री स्तवन मंजरी' वाचीत असतो. घरातील सर्व मंडळी श्री बाबांच्या भक्तीत इतकी रंगली आहेत की लहान मुले श्री बाबांचा फोटो कोठेही दिसला की 'बाबा' असे म्हणून बोटाने दाखवितात.

माझी संपूर्ण श्रद्धा श्री. बाबांवर असल्यामुळे बारीक सारीक गोष्टी सुद्धा मी बाबांच्या कानावर टाकीत असतो. श्री बाबांना आर्तपणे मारलेली हाक कधीही वाया जात नाही.

माझी एक एकर जमीन मी नुकतीच विकली आहे. त्या जमिनीवर होणाऱ्या वसाहतीस 'श्रीसाईकृपा नगर' असे नाव ठेवले आहे. त्याच जागेवर जी जमीन रिकामी आहे तीत श्री बाबांची मूर्ति आणून मंदिर बांधण्याचा माझा विचार आहे. त्यांचे कृपाछत्र अखंड लाभो, हीच प्रार्थना.

# उदी-प्रसाद पाठविण्याची नवी पद्धत

श्री साईबाबा संस्थानला देणगी पाठविणारांना दिनांक ३१-१२ ७८ पूर्वी कापडी पिशवीत उदी-प्रसाद व देणगी पावती टाकून त्यांस पत्ता लिहीलेले लेबल लावून पोस्टाने पाठविण्याची पद्धत होती. परंतु या पद्धतीत लेबल तुटून, प्रसाद व पावती भक्तांपर्यंत न पोहचता मध्येच गहाळ होत असल्याच्या अनेक तक्रारी आल्यावरून उदी-प्रसाद पाठविण्याचे बाबतीत सुधारणा करून दि. १-१-७९ पासून पाकिटात प्लॅस्टीक पिशवीत उदी व प्रसाद टाकून तो भक्तांना पाठविला जातो. मनिऑर्डर द्वारा रक्कम पाठविणारांना मनिऑर्डरची पोच पावती पोस्टा-द्वारा मिळत असल्याने संस्थानची वेगळी देणगी पावती पाठविण्याचे बंद केलेले आहे व सदरची रक्कम इकडे हिशेबात घेतलेबद्दलचा नंबर मनिऑर्डरचे पावतीवर व उदी-प्रसादाचे पाकिटावर स्टॅम्पींग मशिनने दिला जातो व भक्तांच्या इच्छेप्रमाणे रक्कम ज्या त्या कारणासाठीं जमा करण्याची दक्षता घेतली जाते.

साईभक्त याबाबत सहकार्य करतील अशी आशा आहे.

**क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

# मी कधी बाबांच्या पाया पडलो नाही

श्री. बाबुराव जगताप
तेजुकाया मॅनशन,
लालबाग, मुंबई १२

माझे नाव बाबुराव पो. जगताप. मी सध्या मुंबईस रहातो. बाबांना मी पाहिले तेव्हा माझे वय १५ वर्षे असावे : श्री साईबाबांचे शिरडीत वास्तव्य असताना मी तेथून १८ मैल दूर असलेल्या अंदरसुल गावी रहात होतो. त्याकाळी आमचेकडे गंगाधर भिका कासार नावाचे गृहस्थ रहात होते. ते कटलरी व पुस्तके अशा काही किरकोळ वस्तूचा व्यापार करीत. ते जवळपास गावी जत्रा किंवा बाजाराच्या दिवशी व्यापारासाठी जात. त्यांच्या बरोबर माल घेऊन बैलगाडीत टाकून मी देखील जात असे. दुपारी आम्ही बैलांना पाणी पाजण्याकरीता नदीवर नेत असू. हा रस्ता द्वारकामाई मशीदीवरूनच जात होता.

तेव्हा तेथे एक पडीक व भकास वाटणारी मशीद होती. तेथे एक दर्गाही होता. बाबा बहुधा त्या मशिदीतील दगडावर एक पाय गुडघ्यावर ठेवून बसलेले अनेक वेळा दृष्टीस पडत. ते बहुधा एकटेच बसलेले असत. लोकांची ये जा फारशी दिसली नाही. लोक त्यांना साईबाबा...साईबाबा म्हणत म्हणून आम्हीही त्यांना साईबाबाच म्हणत असू.

बाबांचे हात हे सर्वसामान्यांपेक्षा लांब असल्याचे मला आठवते. ते बहुधा गुडघ्यास किंवा त्या खाली देखील पोहचत असावेत. बाबांची दाढी पांढरी शुभ्र दिसत असे. त्यांचे कपाळी गंध आढळत नसे. मात्र बाबांचे कपडे नेहमी स्वच्छ असत. त्यांनी लाल रंगाची कफनी परीधान केलेली मी पाहिली आहे. त्यावेळी धुनी पेटलेली दिसत नव्हती. बाबा, एकाद्या मुसलमान फकीराप्रमाणे दिसत.

परंतु त्यावेळी माझ्या किंवा आसपासच्या बहुसंख्य लोकांचे लक्षात बाबांचे महत्त्व आले नाही. जत्रेनिमित्त १५-१५ दिवस आम्ही शिरडीत रहात होतो. परंतु मी कधी बाबांचे पाया पडावयास गेलो नाही.

# मला घडलेले श्रीसाईदर्शन—श्री गोरक्षकर

'पाठारे प्रभु धर्मशाळा
खो. नं. ६, सोनापूर स्ट्रीट, मुं. नं. २



● लिहीण्यास आनंद वाटतो की मानव जन्म घेऊन लहान वयात अवतारी पुरुषाचे आशिर्वाद मिळणे हे मी माझे परमभाग्य समजतो. हे सर्व घडणे म्हणजे माझ्या मातृ-पितृ व पित्यासम असणारे माझे परमप्रिय चुलते कै. वसंतराव ( उर्फ बाबासाहेब) नारायण गोरक्षकर ह्यांच्या प्रेमळ आशिर्वादाने व त्यांच्या पुण्याईने मला संत पुरुषाचे दर्शन वयाच्या पाचव्या वर्षीच्या सुरवातीस शिरडी ग्रामी मार्च व मे महिन्यात १९१८ साली दोनदा झाले. ते असे की माझे परमप्रिय चुलते ज्यांना मी लहानपणी 'अंकल' ह्या नावानी हाक मारीत असे, त्यांनी मला पुत्रवत सांभाळून शिक्षण दिले. त्यांच्याच आशिर्वादाने आयुष्यातील सुखदुःखाचे दिवस आज मी काढीत आहे. ते मला प्रेमानी 'बॉबी' ह्या नावाने हाक मारीत. त्यांनी मला श्री बाबांच्या हयातीत श्रीक्षेत्र शिरडी ग्रामी नेऊन श्रीसाईबाबांच्या चरणांवर घातले व त्या दिवसापासून आजपर्यंत श्रीबाबाच माझे रक्षण करीत आहेत.

त्याचे असे झाले माझे, अंकल १९०९ पासून शिरडीत श्रीसाईबाबांच्या दर्शनार्थ जात होते व शेवटी त्यांनी आपला देह श्रीसाईचरणी अर्पण केला व बाबांच्या दरबारात ( स्वर्गात ) विलीन झाले. पुष्कळ वर्षे ते श्रीसाई संस्थान शिरडीचे तहहयात सभासद व संस्थानचे विश्वस्त म्हणून काम पहात होते. निवृत्त झाल्यानंतर सुद्धा त्यांचा सल्ला नवीन विश्वस्त मंडळी घेत होती.

मला श्रीसाईबाबांचा आशिर्वाद मिळाला तो योगायोग असा की ज्याप्रमाणे लहान मुलाचे जायवळ करतात त्यावेळेस माझ्या अंकलनी मला श्रीबाबांच्याकडे नेले व त्यांच्या चरणांवर घालून बाबांना विनंती केली की, ह्याचे जायवळ करणे आहे

तरी आपण आशिर्वाद द्यावा, बाबांची आज्ञा झाल्यावर माझ्या अंकलना प्रेमाचे भरते आले व मला म्हणाले बाबांचा आशिर्वाद मिळाला व आपले कार्य पार पडले. ही सर्व आठवण मला ह्या वयात सुद्धा जशीच्या तशी श्रीबाबांच्या कृपेने आठवत आहे. तेव्हापासून आजपर्यंत प्रत्येक गोष्ट श्रीबाबांच्या कृपेने व त्यांच्याच प्रेरणेने होते.

जायवळीच्या दिवशीचा प्रसंगही मला अजून आठवतो तो असा—मी लहान असल्यामुळे जायवळीचे देवकार्यासाठी पहाटे उठल्यामुळे सकाळी १० वा. गाढ झोपलो व तोपर्यंत सर्व कार्यक्रम आटोपले होते. आमच्या घरी गावदेवीला (त्यावेळी आम्ही मुंबईला राहात होतो.) श्रीसाईबाबांची व श्री अक्कलकोट स्वामींची अशा दोन तसबीरी स्टँण्डवर होत्या. त्या तसबीरीच्या समोर मी झोपेतच बरोबर ११ ते ११-१५ पर्यंत बाबा आले, स्वामी आले असे मोठ्याने तीन वेळा बोलून झोपेतच तीन प्रदक्षिणा घातल्या त्यावेळी घरात माझ्या अंकलना चंदन धुपाचा सुगंध दरवळला व श्रीबाबांच्या तसबिरीच्या हारातील १ गुलाब फळीवर पडला त्यावेळी अंकलना आपण बाबांना नैवद्य दाखविण्यास विसरलो असे वाटले व लगेच त्यांनी बाबांना नैवद्य दाखविला; नंतर आम्ही परत मे महिन्यात श्रीसाईदर्शनास शिरडीस गेलो, त्यावेळेला बाबा माझ्या अंकलना म्हणाले की, काय रामभक्त मी व स्वामी तुझ्याकडे आलो पण आम्हास भोजन विसरलास. अंकलनी बाबांची माफी मागून क्षमेची याचना केली.

श्रीबाबा माझ्या अंकलना नेहमी रामभक्त म्हणून हाक मारीत कारण माझे चुलते प्रथमपासून मनात श्रीराम जयराम जयजय राम हा जप नेहमी करीत हे फक्त श्रीबाबांनी बरोबर ओळखले व त्यांना रामभक्त म्हणून हाक मारीत असत. अशी मला श्रीबाबांच्या चरणाची धूळ माथी लावण्याची संधी मिळाली. संधी मिळून देण्या-बद्दल मी माझे पितृतुल्य चुलते ह्यांचा अत्यंत ऋणी आहे.

श्रीबाबांच्या पवित्र चरणी हीच विनंती करतो की त्यांच्या बालकांना व माझ्या चुलत्यांच्या कुटुंबाला व त्यांच्या एकुलत्या एक नातवास अखंड वरदहस्त सदैव असावा हीच श्रीचरणी माझी विनंती.

गुरु-शिष्याची जोडी पहाण्याचे भाग्य लाभलेल्या

# श्रीमती अंबुताई मुळे

**श्री. अशोक खांबेकर**
संपादक, साप्ताहिक गणराज्य,
कोपरगांव.

● 'तूम यहाँसे तीन मैलपे साकोरी नामका ग्राम है, वहाँ जाईये उधर तेरे जीवन का उद्धार होनेवाला है!' शिर्डीपती श्रीसाईबाबा उपासनी महाराजांना म्हणतात. ठिकाण आहे शिर्डी येथील खंडोबाचे मंदीर.

उपासनी महाराज सटाणा जिल्हा नासिक येथून निघाले व जवळच असणाऱ्या गवळणवाडीच्या डोंगरात गेले. तेथे त्यांनी ६ महिने तपश्चर्या केली, व दिव्य प्रचितीचा साक्षात्कार होताच ते भटकत भटकत शिरडीच्या खंडोबाच्या मंदीरात आले. नेहमीप्रमाणे खंडोबा मंदीराचे पुजारी म्हाळसापती भगत यांनी अंतःकरणपूर्वक स्वागत केले. तथापि म्हाळसापतींनी साईबाबा खंडोबा मंदीरात येताच 'आओ साईबाबा' या भावपूर्ण शब्दांनी स्वागत केले होते, व शेवटी शिर्डीपतीनी 'साईबाबा' हेच नाव त्यांच्या महानिर्वाणापर्यंत धारण केले होते. परंतु या ठिकाणी म्हाळसापतीनी त्यांना कुठल्याही प्रकारची संज्ञा न वापरता केवळ हसत मुखाने स्वागत केले, व खंडोबामंदिरात निवारा दिला. त्यानंतर म्हाळसापती भगत व उपासनीबाबा यांची चर्चा झाली. श्रीसाईबाबा नेहमीप्रमाणे खंडोबाच्या मंदिरात म्हाळसापती भगतांशी गप्पा मारण्यासाठी व गुजगोष्टी करण्यासाठी येत असत. ती वेळ होती सायंकाळची सुमारे ५ ची. त्याच दरम्यात साकुरी येथून कु. सखूबाई काशिनाथ भांबारे (सध्या श्रीमती अंबुताई त्रिंबक मुळे) ही १८ वर्षाची तरुणी आपल्या वडिलांबरोबर शिर्डीस श्रीसाईदर्शनास जात असताना शिर्डीस खंडोबामंदिरात दर्शनासाठी गेली. त्यावेळी तिने श्रीसाईबाबांनी वरनिर्देश केलेले वाक्य उच्चारले. उपासनी महाराज व म्हाळसापती भगत यांची चांगलीच मैत्री जमल्याने त्यांना शिरडी सोडून जाण्याची इच्छा होईना. परंतु श्रीसाईंच्या इच्छेपुढे त्यांचे काही चालेना. एके दिवशी श्रीसाईबाबांनी खंडोबा मंदिरातून त्यांना हाकलून दिले. व इकडे 'मी बोलवित नाही तो पर्यंत येऊ नको' असा आदेश दिला. या आदेशानुसार उपासनीबाबा पायी-पायी चालत साकोरीस चालले असता राहाता येथील दौलू मारवाड्याच्या शेतात बैल नांगरणी चालू असताना उपासनीबाबा नांगरास आडवे झाले व बैल सोडण्यास

सांगितले व ते स्वतः नांगरास बैलाप्रमाणे जुंपले व नांगरणी केली. जशी श्रीसाई-माऊली प्राणीमात्रावर दया करणारी तसेच त्यांचे शिष्य असणार यात संदेह नाही.

श्रीसाईबाबांच्या आदेशाप्रमाणे उपासनीबाबा साकुरीस आल्यानंतर त्यांना साकुरीचे कै. त्रिंबकराव यशवंतराव मुळे (श्रीमती मुळे यांचे पती), केशवराव पाटील दंडवते, श्री. सखाराम दंडवते, शंकरराव रोहम, श्री. बाबुराव दंडवते या प्रतिष्ठितांनी स्मशानभूमीत (सध्या जेथे उपासनीबाबाचा आश्रम आहे) एक पाचटाची झोपडी बांधून दिली. श्रीसाईबाबा व उपासनीमहाराज यांची खंडोबा मंदिर शिरडीत चाललेली चर्चा काशिनाथ भांबारे व कु. सखूबाई भांबारे यांनी वर निर्देश केलेल्या गावकऱ्याना सांगितली व हा श्रीसाईआदेश आहे असे समजून त्यांच्याशी कसलाही वादविवाद न करता स्मशान भूमीत झोपडी बांधून दिली. आजही उपासनी बाबांच्या या आश्रमाला 'झोपडी' म्हणून खेड्यातील लोक ओळखतात. योगायोगाने आपले वडिलांबरोबर सखूबाई ही उपासनीबाबांच्या दर्शनास गेली असता तेथे असणाऱ्या त्रिंबकराव यशवंतराव मुळे यांचेबरोबर उपासनीबाबांनी सखूबाईचे लग्न (विवाह) ठरविले, व पुढे ते दोघे विवाहबद्ध झाले व उपासनीबाबांचे निस्सीम भक्त बनले. बाबा जेथे जेथे भ्रमण करीत तेथे तेथे ते बाबाबरोबर जात असत.

उपासनीबाबा हयात असताना कोणताही नवीन उपक्रम व धार्मिक कामाचा शुभारंभ श्रीसाईबाबांचा आदेश घेतल्याशिवाय करीत नसत. आजही ही परंपरा चालू असून उपासनी आश्रमातील कन्याकुमारी बाहेरगावी एखाद्या कार्यक्रमास जाण्यापूर्वी शिर्डीस श्रीसाईबाबांच्या दर्शनास येत असतात. आशीर्वाद व संमती घेतल्यानंतरच पुढील कार्यक्रमास प्रारंभ करतात. रथसप्तमीच्या दिवशी उपासनी बाबा हयात असताना उपासनीबाबा व श्रीसाईबाबाचे फोटो ठेवून त्यांच्या नामाचा गजर करणारा रथ शिर्डीच्या खंडोबा मंदीरात येत असे, ही परंपरा आजतागायत त्यांचे भक्त चालवित आहेत. उपासनीबाबा रथसप्तमीच्या दिवशी शिर्डीच्या खंडोबा मंदिरात आले म्हणून ही परंपरा चालू आहे.

अशीही गुरूशिष्याची जोडी पाहणारी साकुरीची भाग्यवान महिला श्रीमती अंबुताई त्रिंबक मुळे हयात असून' शेतामध्ये परमेश्वर नामस्मरण अहोरात्र ठेवून शेती व्यवसायाची देखभाल करून देशाच्या उत्पादन क्षमतेमध्ये भर घालीत आहे.

▲ ▲ ▲

# हरद्याच्या सद्‌भैय्यांचे चिरंजीव
# श्री. लक्ष्मणमामा नाईक

—श्री. लक्ष्मण सदाशिव नाईक
३५, खाती पुरा रोड,
इंदोर ७. म. प्र.

● माझे नाव लक्ष्मण सदाशिव नाईक. जन्म १४–१–१९०८ हरदा (मध्यप्रदेश) येथे झाला. वडील सदाशिव धुंडिराज नाईक. सन १९११ पासून हरदा येथून श्री छोटू भैय्या परुळकर मित्राबरोबर शिर्डीस श्रीचे दर्शनाकरिता वर्षातून ३–४ वेळा जात असत, असे माझे मातोश्रीकडून कळले होते.

सन १९१२ मध्ये वडिलांनी मातोश्रीसह सर्व मुला-मुलींना श्रींचे दर्शनास शिर्डीस आणले त्यावेळी माझे वय चार-साडेचार वर्षाचे होते. माझी एक मोठी बहीण श्रींच्या दर्शनाकरिता राहिल्याने, तिला श्रीबाबांचे दर्शनाकरिता सन १९१६ मध्ये वडिलांनी शिर्डीस नेले, त्यावेळी आम्हा तिघा बंधुसही शिर्डीस घेऊन गेले. सन १९१६ मध्ये माझे वय आठ नऊ वर्षाचे असून श्रीसाईबाबास समक्ष पाहिल्याचे चांगले आजही आठवते व श्रींचे चावडीचा सोहळा ही प्रत्यक्ष पाहिल्याची आठवण आहे. त्यावेळी आम्हा तिघा भावांना चावडीच्यावेळी संध्याकाळी श्री राधा कृष्णी आईचे घरी नेण्यात आले व सर्व मुलांच्या कपाळावर, गालावर व डोळयांच्या आजूबाजूस कनपटीवर गोपीचंदनाच्या मुद्रा लावून हातात मोरचले व पताका देऊन श्रींचे पालखीबरोबर चालण्यास सांगितले. त्यावेळी माझे वडीलही आमच्या बरोबर चालत चावडीपर्यंत आल्याचे आजही आठवत आहे. तसेच श्रींचे चरणी मस्तक ठेवले त्यावेळी श्री माधवराव (श्यामा) ने बाबास हे तिघे मुले श्री सद्‌भैय्यांची आहेत असे सांगताच श्रींनी आमचे (माझे) कपाळास अंगठ्याने उदी लावल्याची आठवण आजही आहे.

वडिलांची भक्ती पाहून श्रीसाईबाबांनी आपला मोठा फोटो जो दिक्षीत वाड्यात माडीवर होता तो भक्त बालकराम मुक्ताराम याजबरोबर सन १९१५ मध्ये दास नवमीच्या दिवशी आमच्या घरी हरदयास पाठविला असे माझे वडिलांकडून कळले.

श्रीबाबांचा फोटो आल्यापासून फोटोची पूजा व आरती शिर्डीप्रमाणे आमच्या घरी रोज होत असे. सन १९३६ मध्ये वडिलांच्या मृत्यूनंतर नोकरीनिमित्त माझे राहणे इंदूर येथे झाल्याने श्रींचा फोटो माझे घरी पुजेत आजही आहे. आम्हा तिघा बंधूपैकी मी एकटाच हयातीत आहे. वडील श्रीबाबांचे निकट भक्त असल्याने त्यांचा फोटो श्रीचे दरबारात श्री दिक्षीत ह्यांच्या फोटोशेजारी लावलेला आजही पहाण्यात येतो. फोटोखाली नाव श्री सदुभैय्या नाईक हरदा अशी पाटी आहे. वडिलांनी सांगितलेले पुष्कळ अनुभव व गोष्टी आजही आठवतातात, श्रीचे आशिर्वादाने आम्ही सर्व आनंदात आहोत.

# मी पाहिलेले श्रीसाईनाथ—श्री. कोठारे
# श्रीबाबांनी आईचे सौभाग्य राखले

**श्री. रामकृष्ण ग. कोठारे, एम्. ए.**
साई मंझील, १५१ लेडी जमशेटजी रोड,
माहिम, मुंबई ४०० ०१६

• माझा जन्म १९०८ साली पाठारे प्रभु ज्ञातीतील एका सधन घराण्यात झाला. मी मुंबई विद्यापीठाची एम्. ए. पदवी घेतली आहे. सुरवातीला शिक्षकाची व नंतर एका खाजगी कंपनीत नोकरी स्वीकारली. गरजू विद्यार्थ्यांना मी विनामूल्य 'टयूशन' देत असे.

माझ्या आईवडिलांनी १९११ साली श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले. पाल्र्याचे आर्टीस्ट जयकर ह्यांनी काढलेल्या बाबांच्या छायाचित्राचे, ते पूजन करीत. वर्षातून दोनदा तरी ते मुलाबाळांसह शिरडीस साई दर्शनास जात. इ.स. १९१८ साली गुरू-पौर्णिमेस आम्ही बाबांचे दर्शन घेतले आणि तेच शेवटचे ठरले. त्यावेळी भरजरी कांभळा पितांबर नेसलेली द्वारकामाईच्या कठडयावर उभी राहून सुहास्य मुद्रेने भक्तांना आशिर्वाद देणारी बाबांची मूर्ती अजूनही माझ्या मनःचक्षुपुढे उभी राहाते.

हेमाडपंत लिखीत साईलीला अध्याय ५१ यात वर्णन केलेल्या सान्ताक्रूझच्या धुरंधर घराण्यातील कु. नलिनी धुरंधर बी. ए. हिच्याशी मी विवाहबद्ध झालो. तीही शिक्षिका होती. माझा मुलगा व सून दोघेही 'सायन्स' पदवीधर आहेत. व दोघेही नोकरी करतात. त्यानाही एक वर्षाचा मुलगा आहे.

सुरवातीला मी साईबाबांचा विशेष चाहता नव्हतो. केवळ आई-वडिलांना बरे वाटावे म्हणून बाबांच्या पाया पडत असे. पण बाबांनी मला त्यांच्या पायाशी खेचून नेले व साईभक्तीस लाविले. आयुष्यात अनेक संकटे आली, विघ्ने ओढविली पण साईकृपेने त्या सर्व संकटातून मी बचावलो.

आज माझे सर्व कुटुंबीय साईभक्ती करतात. त्यांचे भजन, पूजन करतात. हाच श्रीसाईबाबांचा माझ्यावर वरद्‌हस्त आहे, असे मी समजतो, व तो सदोदीत माझ्या पश्चात् माझ्या मुलानातवंडावर असावा, हीच प्रार्थना.

'श्रीसाईनामाचे स्मरण, करी विघ्नाचे हरण।'

माझ्या आई-वडिलांनी इतर नातेवाईकां समवेत १९११ साली शिरडीस श्रीसाईबाबांचे प्रथम दर्शन घेतले. तेथून परतल्यावर त्या सर्व मंडळीच्या अनुमतीने त्यांनी 'साई-लॉज' म्हणून भजन मंडळ स्थापन केले. दर गुरूवारी सर्व मंडळी एकत्र जमून बाबांची आरती व भजन करीत.

१९१३ साली माझे वडील 'न्यूमोनियाने' आजारी झाले, व त्यांची स्थिती एकदम 'सीरीयस' झाली. विख्यात डॉ. नायक ह्यानी वडिलांची बरे होण्याची आशा सोडली. आईने बाबांची प्रार्थना करून 'सौभाग्यदान' मागितले, व नवस केला की 'माझे सौभाग्य मला परत मिळाले तर बाबा तुमच्या दर्शनाला मी पायी अनवाणी येईन. बाबा माझे सौभाग्य वाचवा.' वडिलांची अत्यवस्थ आजाराची बातमी 'साई-लॉजच्या' मंडळाला कळताच त्यांनी आमच्या ओट्यावर भजन करण्यास सुरवात केली. त्यात माझ्या मामाकडील मंडळी होती. मामा व भजन मंडळ म्हणाले, 'साईबाबांचे भजन चालू आहे. ताई तुमच्या सौभाग्याला धक्का लागणार नाही.'

रात्री १० वाजता डॉ. नायकांनी स्पेशल व्हिजीट दिली. एक इंजेक्शन दिले व चुलत्याना सांगितले, 'पेशन्ट जिवंत राहाण्याची शक्यता कमी. फार तर रात्री १२ वाजता कारभार संपेल. रात्री तू मला १ वाजता प्रकृति कळीव' आजोबाने भगवत गीतेचे वाचन सुरू केले. ११ च्या सुमारास वडिलांना शेवटचा घरघराट सुरू झाला. सर्वांनी आशा सोडली. आजोबा कर्मठ असल्यामुळे व त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे पलंगाजवळ पाण्याची रांगोळी घातली व त्यावर तुळशीपत्रे ठेविली. देहान्त होताच देह लगेच भूमीवर ठेवावा हाच उद्‌देश्य.

आईची स्थिती काय झाली असेल हे सूज्ञ वाचकांना सांगावयास नकोच. भीड मर्यादा सोडून 'बाबा, लेकीचे सौभाग्य वाचवा' अशी करुण किंकाळी

तिने फोडली व बाबांचा धावा सुरू केला. सर्व मंडळींनी तिला दटाविली. भजन मंडळी निर्धारपणे साईबाबांचे भजन करीत होती. १२ वाजले, १ वाजला आणि घरघराट थोडा कमी होत गेला. पण पूर्ण थांबला नाही. रात्री दोनच्या सुमारास मुलते डॉक्टरांच्या घरी गेले. डॉक्टरांनी वडिलांना तपासले, एक इन्जकशन् दिले व आजोबाना सांगितले की, केस आता माझ्या हातात आली. Crises are over आजोबांनी स्वयंपाक्याकडून कॉफी तयार केली व भजन मंडळीस व सर्वांना कॉफीपान दिले. भजन मंडळी पहाटे ४ वाजेपर्यंत भजन करीत होती. जाताना त्यांनी आईला सांगितले की, ताई बाबांनी तुमची प्रार्थना ऐकली. आपण सर्व मंडळी श्रीसद्गुरु साईबाबांच्या दर्शनास लवकरच जाऊ. वडिलांच्या आजारास त्या दिवसापासून उतार पडू लागला व थोड्या दिवसानी ते घरात हिंडू लागले. डॉक्टरानी आजोबाना सांगितले, 'तुमच्या मुलाचा पुनर्जन्म झाला ह्याचे श्रेय मला नाही.'

काही महिन्यानी आई-वडील व भजन मंडळी शिरडीस जाण्यास निघाली. त्यात अस्मादिकाची स्वारी होती. पहाटे कोपरगाव स्टेशनवर उतरलो. ३ खटाऱ्यात इतर नातेवाईक व आम्ही मुले बसलों, पण आई मात्र अनवाणी चालू लागली. आम्ही कोपरगावात आलो. आम्ही सर्वांनी गोदाकाठी स्नाने केली. चहा व फराळ केला, पण आईने पाण्याचा थेंबही घेतला नाही तर चहा कुठला ?

साधारण ९ च्या सुमारास गोदाथड सोडून शिरडीची वाट धरली. त्यावेळचे रस्ते कसे असतील ह्याची कल्पना रहदारी पासून दूर असलेल्या खेडेगावात गेल्या-शिवाय कळणार नाही. शिरडीसुद्धा एक लहानसे खेडे होते. नेहमी आईच्या पायात मऊमऊ असे मखमलीच्या गादीचे जोडे असत. ती माऊली त्या धुळीच्या, खाच-खळगे, बारीक दगड, काटे अशा रस्त्याने कशीबशी चालली होती. काटे बोचून पाय ठणकायला लागले. शेवटी ती एका झाडाखाली विश्रांतीसाठी बसली. इतक्यात हातात एक लांब काठी, डोक्याला मुंडासे घातलेला एक दाढीवाला धनगर मेंढ्यांच्या कळपासह तेथे येऊन ठेपला. आईच्या पायाकडे पाहून म्हणाला, 'बाई कशाला इतका त्रास घेतेस. तुझा नवस साईबाबांना पोहचला. जा गाडीत बैस.' आईने त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले. वडिलांनी व इतर मंडळींनी आईचे मन वळविण्याचे प्रयत्न केले. पण व्यर्थ. आईचा पायी प्रवास हळूहळू चालला.

येथे शिरडीस साईबाबांच्या माध्यान्हीच्या आरतीचा समय झाला. आरतीची पूर्व तयारी होत असताना बाबा म्हणाले, 'बापू, लई घाई का ? जरा सबूर !' जाणकर मंडळी समजली की बाबा कोणाची तरी वाट पहात आहेत. काही वेळानी

आमच्या गाड्या शिरडीस पोहचल्या. आईने बाबांचे चरण घट्ट धरले व अश्रूने धुवून काढले. बाबांनी आईला उदी दिली व सर्व अंगास लावण्यास सांगितली. काही वेळाने बाबा म्हणाले, 'नाना काय करावे. रस्त्यांत भेटलो. तुझा नवस फिटला. आता गाडीत बस, असे सांगितले. पण आईचा हट्ट निराळा. आता पाय दुखतात व फोड आले आहेत पायाना. जा संध्याकाळी पाय पूर्ण बरे होतील." आईला व इतर मंडळींना तो रस्त्यावरील धनगर आठवला. सकाळी आईचे पाय पूर्ण बरे झाले.

बाबा सर्वव्यापी, सर्व साक्षी; सर्वत्र आहेत असे १९७९ साली जगन्मान्य झाले आहे. पण १९१३ साली 'शिरडीचा वेडा फकीर'; 'मुसलमान अवलिया', असा मुंबई शहरात विशेषत: आमच्या सुशिक्षित ज्ञातीत टीका होत असे. अशा वेळी माझ्या आई वडिलांनी, व मामांनी व इतर नातेवाईकांनी श्रीसाईबाबांना गुरुस्थानी मानून त्यांची आमरण उपासना केली. धन्य ते लोक व धन्य त्यांची साईभक्ति.

बाबांनी माझ्या वडिलांना मृत्यूच्या पाशातून सोडविले. आईला धनगराच्या रूपात दर्शन दिले, ही अघटीत घटना नव्हे का ? थोडक्यात.

**जेथे चाले साईरामाचे भजन । यम करी तेथून पलायन ॥**

❋ ❋ ❋

### श्रीसाई समकालीन व्यक्ती

## श्री. बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी

**शब्दांकन—सौ. उषाताई मुळे,** शिरडी

● श्री. बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी. श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व त्यांच्या सहवासात राहिलेल्या व्यक्तींपैकी श्री. बाप्पाजी रत्नपारखी हे सध्या शिर्डी येथे श्री विठ्ठलाचे पुजारी आहेत. त्यांचे वय ८२ वर्षांचे आहे, परंतु प्रकृतिने निकोप आहेत. पूजा-अर्चा रोजचे नैमत्यिक कार्यक्रम चांगल्या रीतीने पार पाडतात. १९१० पासून ते बाबांचे सहवासात आहेत. बाबांचे समवेत भिक्षेच्या फेरीस जाणे, धुनीस लाकडे आणून देणे, आरतीच्या वेळी गादी व सिंहासन लावणे; आरतीनंतर तीर्थ-प्रसाद भक्तास देणे; बाबांनी स्नान केल्यावर त्यांचे पाय व अंग पुसणे; पितांबर देणे इ. सेवा ते करीत. रत्नपारखी यांची ७ पिढ्यापासून विठ्ठलभक्ती चालू आहे. श्रीसाई

बाबांनी श्री. दासगणू महाराजास विठ्ठल मंदिरात बसावे अशी आज्ञा केली, तेव्हा त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली. त्यानी रूक्मीणी मातेची–मूर्तीची स्थापना केली.


श्रीसाईबाबा मंदिराजवळ उभे राहून भक्तांना दर्शन देत असत. श्रीसाई-बाबांच्या अमृततुल्य दृष्टांताचा 'अनुवाद'—

लक्ष्मण भट निद्रेच्या भरी साई प्रगटले विठ्ठल मंदीरी ॥
चल उठ वेगे करी । काकडारति माझी ॥ १ ॥
मी आहे नित्य जीवंत । मुंग्यासारखे येतील भक्त ।
तया मी पावेन सत्य । श्रद्धा सबूरी असावी ॥ २ ॥

श्रीसाईबाबा हे १५ अक्टोंबर १९१८ मंगळवारी दुपारी समाधिस्त झाले. त्यावेळी त्यांचे जवळ फक्त बयाजी पाटील; भागुजी शिंदे; लक्ष्मीबाई; माधव फसले व बाप्पाजी रत्नपारखी हे होते. त्यांचा सेवक माधव फसले याने विडा कुटून दिला व नंतर पाण्याची झारी देऊन महाराजांनी पाणी घेतले. ते थोडे परत बाहेर आले व नेत्र अर्धोन्मिलीन झाले. बाप्पाजी रत्नपारखी यांनी डॉ. पिल्ले यांस दिक्षीत वाड्यातून बोलावून आणले. त्यांनी नाडी तपासली तेव्हा त्यांना दुःखाश्रु आले व सर्वांस दुःखद बातमी सांगितली व सर्व गाव शोक सागरात बुडाला. नंतर १६–१०–१८ रोजी पहाटे विठ्ठलाचे पुजारी लक्ष्मण भटजी यास दृष्टांत झाला. 'चल उठ माझी काकडारती करून पूजा कर'. त्यांनी अखेरची पूजा आरती केली. नंतर उदी प्रसाद घेऊन विडा दक्षणा देऊन श्रीसाईबाबाना नमस्कार केला. हे श्रीसाईचरित्र अध्याय ४३ ओवी १६१ पहावी. म्हणजे सत्य पटेल. श्री. बाप्पाजी हे श्रीसाईबाबांच्या जवळ बसत होते. श्री बाबांचे कान विंधलेले होते हे त्यानी स्वतः पाहीले होते. श्रीसाईबाबा हे ब्रम्हचारी वैराग्यशील अजानबाहू दयार्द्र धर्मात्मे योगी होते. त्यांचे चमत्कार दृष्टांत अद्यापही अनेक भक्तास येत आहेत. म्हणून लाखो भक्त शिर्डीची वाट चालत आहेत. श्रीबाबांनी आपल्या हाताने गोड भात करून भक्तास वाटावा. गहू दळून पोळ्या करून वाटणे आलेले नैवद्य भक्तास वाटणे. तसेच संध्याकाळी रोख पैसे जवळ जवळ ७०० रुपयेपर्यंतही धर्मार्थ ते देत असत, म्हणून लोभी लोकांची गर्दी होत असे. श्रीबाबा हे सत्याचे पुजारी होते व अद्यापही आहेत. अगाध बाबांची शक्ती । कडू निंबासी गोड करीती । सध्या खरी भक्ती दिसत नाही. बनावट बुवाबाजी सुरू आहे. म्हणून भक्तानो यापासून सावध रहावे असे श्रीबापाजी सांगत असतात. त्यांना आपल्या प्रसिद्धीची हाव नाही, किंवा श्रीबाबांच्याबद्दल काही सांगण्यासही ते तयार नसतात. बनावट चरित्र आत्मलोभ यापासून ते दूर आहेत. असे हे आमच्या शिरडीमध्ये श्रीसाईबाबांच्या समकालीन असलेले पूज्य बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी.

# श्री. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने

## शिरडीच्या पूर्वीच्या वैभवासंबंधी लिहितात—



श्री. द. दा. रासने
४४२, रविवारपेठ, पुणे

● श्रीसद्गुरू साईबाबा यांना समक्ष पाहिलेले आणि त्यांच्या हयातीत त्यांचे जवळ राहिलेले साईभक्त आजमितीस हाताच्या बोटांवर मोजण्याइतके शिल्लक राहिलेले आहेत. माझ्या वडिलांच्या पुण्याईने ही सुवर्ण संधी मला मिळालेली आहे. आज माझे वय ऐंशी आहे. माझे जावळ बाबांच्या मांडीवर झाले आहे. माझ्या लहानपणी शिर्डी कशी होती हे मी या लेखात सांगणार आहे.

(१) श्रीद्वारकामाईचे आजचे रूप त्यावेळी आजच्या सारखे नव्हते. फरशीचे जागी जमीन होती. आणि धूनीजवळील जमीन किनार नित्यपणे सारवली जात असे, आणि ही कामगिरी लक्ष्मीबाई शिंदे (पाटलीणबाई) मु. शिर्डी न चुकता करीत व मसाला चटणी वाटणेही त्याच करीत.

(२) बाबांचे स्नानासाठी पाणी गरम करणे व त्यांचे कपडे धुणे ही जबाबदारी श्री. महादू फसले सांभाळीत होते. त्यांच्याशिवाय या दोन्ही गोष्टी कोणीही करीत नसत.

(३) श्रीसाईबाबा लेंडीबागेत ज्या रस्त्याने जात असत तो रस्ता राधाकृष्ण आई व अब्दुलबाबाभाई, नित्यनियमाने झाडून लोटून पाण्याचा सडा टाकीत असत व प्रसंगी त्यावर शोभीवंत रांगोळीही काढीत असत. दिवाबत्ती करण्याची कामगिरी ही अब्दुलबाबाभाई यांचेकडे होती. याशिवाय दिवसातून तीन वेळा ते कुराण वाचीत असत.

(४) धूनी सदोदीत प्रज्वलीत राहावी यासाठी धूनीमध्ये सरपणे टाकण्याचे काम महादू फसले यांचेकडेच होते. शिवाय धुनीतील राख (उदी) नीट करून ठेवणे हेही काम फसलेच करीत. श्रीसाईबाबा ज्या रस्त्याने जात त्या रस्त्यावर फुलांच्या वेलीच्या कमानी होत्या. त्या नेहमी टवटवीत राहाव्या म्हणून त्यांना पाणी घालण्याचे काम महादू फसले हे करीत. गावच्या विहीरीतून कावडीतून पाणी आणून

झाडांना घालण्याचे कष्टाचे काम फसले आनंदाने करीत. तसेच श्रीसाईबाबांचा बाडबिस्तरा एकदिवसा आड चावडीत नेण्याचे महत्त्वाचे काम महादू फसले यांचे-वरच सोपविण्यात आले होते.

(५) श्रीद्वारकामाई ते सध्याचे समाधीमंदीराचे दरवाज्यापर्यंत सडक रस्त्या-वर कमानी लाकूड व लोखंडी जाळीच्या कमानीचे मधल्या भागात वरूनही जाळीवर वेल सोडलेले होते. जाई जुई चमेली गारवेल मधुमालती असे वेल होते अशा तऱ्हेच्या कमानी चावडी समोरही होत्या. या सर्व वेलींची शोभा उत्तम दिसत होती व त्याची योग्य दखल घेतली जात असे.

(६) श्रीद्वारकामाईत खांबावर चौकोनी काचांचे पत्र्याचे रंगीबेरंगी दिवे होते, सभामंडपात हंड्या आणि झुंबरे-आरसे फोटो व भींतींस घड्याळ मध्यभागी लावल्यामुळे द्वारकामाई शोभीवंत दिसे. सभामंडपाचे दोन गरडरचे खांबामधील भागात लाकडाची चार इंची फळीवर पणत्याही लावल्या जात होत्या तसेंच श्रीद्वारकामाई इमारतीचे दर्शनी पडवीचें कमानीवर पत्र्याचे चौकोनी लहान कंदील लावीत असत.

(७) धूनीमध्ये भक्त उद-कापूर-अगरबत्त्या व चंदनभुसा लाकडे टाकीत व तसेंच श्रीद्वारकामाईचे पुढील ओट्यावर लाकडाचे ठोकळ्यांवर भोके असलेल्यात उदबत्त्या लावत, धूनीला नैवेद्य म्हणून दहिभात, तूपभात अर्पण करीत, ही प्रथा अजूनही चालू आहे.

(८) श्रीद्वारकामाईत मातीचे ३/४ पाण्याचे माठ व त्यावर झाकणे व पाणी पीण्यासाठी तांबे पीतळेचे, टमरेलही ३/४ होती. ते माझे वडील नगरहून करून आणीत, व एक मातीची कुंडी, कोळंबे होते आणि त्यात श्री भीक्षा मागून आणलेले अन्न ठेवून त्यावर झाकण घालीत. त्या मातीचे परळामधूनच श्रीसाईबाबा भोजन करीत, भीक्षेचा पुष्कळसा भाग स्वतः हातानी कुत्री मांजरे आंधळी लंगडी माण-सांना देऊन राहीलेला भाग ते खात.

(९) श्रीद्वारकामाईचे मधल्या भींतीच्या कमानीस 'निंबर' असे म्हणत असत आणि त्या कमानीस फुलांचे शेरे हार घालण्यास श्रीसाई भक्तांना सांगत, स्वतःचे गळयात त्यांनी फुलांचे हार घालून घेतले नाहीत व द्वारकामाईचें महत्त्व ते द्वारकामाई ही आपली आई आहे व धुनी आपली माय आहे असे भक्तांस श्रीसाई-बाबा सांगत असत.

(१०) श्रीसाईबाबांची अन्नदान करण्याची पद्धत विलक्षण होती. तांदूळांचा गुळभात करताना त्यात अनमोल तूप घालीत, त्याशिवाय खोबऱ्याचा कीस मोठ्या प्रमाणात तो टाकून अत्यंत चवीष्ट असा तो गुळभात करीत. केशरी साखरभातात तर

ते भरपूर केशर तूप बेदाणा बदामबीचे तुकडे वेलदोडे टाकून स्वादिष्ट असा तो केशरी भात करीत. दुसरे मसाले भात करताना शेंगदाणे काजू तूप व दालचीनी मीरे जिरे वाटून तो मसाला टाकीत. शिजवल्यावर त्यावर खोबऱ्याचा कीस टाकून हें सर्व वरील प्रकार स्वतः हातांनी करीत असत. सुंदर असे पक्वान्न तयार झाल्यावर देवास नैवेद्य देऊन मग सर्व गरीबास आंधळयास लंगड्यास पांगळयास फकीर साधू गोसावी बैरागी संन्यासी यांना मुक्तहस्ते वाटून टाकीत असत व त्यांचा आत्मा तृप्त करीत.

(११) नैवद्य म्हणून गावातील लोक दररोज भाकरी चटणी भाजी कांदे पीठले श्रीद्वारकामाईत आणून देत ते सर्व श्रीसाईबाबा गरीब लोकाना वाटून टाकीत शिवाय जर भाकरी शिल्लक राहिली तर दुसरे दिवशी श्रीसाईबाबा हाताने त्या भाकरी बारीक कुस्करीत आणि त्याला चांगली तीखटमीठाची जिरेमिरे हिंगाची फोडणी देत व कोथंबीर घालून हा भाकरीकाला येणाऱ्या सर्व गरीब लोकाना वाटून टाकीत. धान्यरूपाने भीक्षा आली तर ते जात्यामध्ये घालून जाडे भरडून त्याच्या कण्या करीत आणि त्या कण्या शिजवून गरीबाना वाटून टाकीत असत.

---

# श्रीसाईबाबांचे सहवासातल्या आजच्या शिरडीतील काही व्यक्ती

## श्री. आप्पा सुतार



श्रीबाबांना पाहिलेले आप्पा आजही शिरडीत हिंडता-फिरताना दिसतात. त्यांची शरीरप्रकृती आजही वयाच्या ७८ व्या वर्षी चांगली आहे. बाबांच्या वेळी ते चोपदार होते व बाबांच्या निर्वाणानंतर संस्थान झाल्यावरही ते चोपदार म्हणून नोकरीस होते. १९७८ साली ते संस्थानातून सेवानिवृत्त झाले. बाबांच्यावर त्यांची भारी श्रद्धा. आपल्या उभ्या हयातीत ते शिरडी सोडून कधीच कुठे गेले नाहीत. ते ज्योतिष उत्तमपैकी जाणतात.

* * *

### श्री. रंगनाथ गुरव

श्री. रंगनाथ बाळा गुरव ( गोरक्ष ) यांनी बाबांच्या सहवासात राहून बाबांचे असंख्य वेळा दर्शन घेतले आहे. बाबांना पंख्याचा वारा घालण्याचे काम द्वारकामाईत ते करीत असत. संस्थानमध्ये त्यांचेकडे गॅसच्या दिवाबत्तीचे काम होते. १९७८ साली ते संस्थानच्या कामगिरीतून सेवानिवृत्त झाले. सध्या त्यांचे वय ७५ चे सुमारास आहे.

* * *

### श्री. निवृत्ती हनुमंत पाटील गोंदकर

यांचे वय आज ७४ वर्षाचे आहे. शरीरप्रकृती धडधाकट असून श्री. शेळके यांच्या पडवीत बसलेले नेहमी आढळतात. बाबांवर त्यांची खरी भक्ती आहे. बाबांना ते 'देव' मानतात. शिक्षण नसतानाही संत वाङ्मयाचा यांचा व्यासंग आहे. एखादया संतावर किंवा बाबांवर ते अस्खलीतपणे बोलू शकतात. बाबांकडे हे छडीदार होते.

* * *


## श्रीमती ताई निमोणकर

यांचे नाव आहे लक्ष्मीबाई देशपांडे निमोणकर पण साईभक्तात त्या 'ताई' म्हणून परिचित आहेत. त्यांचे वय आज ७६ वर्षांचे आहे. त्या निमोणच्या. त्यांचे सासरे ज्यांचा उल्लेख श्रीसाई सच्चरितात नानासाहेब निमोणकर म्हणून आहे ते मामलेदार होते. ते श्रीसाईबाबांचे उपासक होते. बाबा असताना ताईंनी शिरडीची वारी अनेकदा केली आहे. बाबांचे असंख्य वेळा दर्शनसुख घेतले आहे. बाबांना प्रथम पाहिले त्यावेळी त्यांचे वय १६ वर्षाचे होते. त्यांची कन्या दुर्गा ही तर बाबांचे पानात जेवलेली आहे. आज श्रीसाई समाधी मंदिरावरील कळसावर दोन भगवी निशाणे फडकताना दिसतात. त्यापैकी एक श्री. नानासाहेब रासने यांचे व दुसरे आहे श्री. नानासाहेब निमोणकरांचे. ताई निमोणकर बाबांचे वर्षाकाठीचे तिन्ही उत्सवास अगदी एकट्या शिरडीस येतात. बाबांच्या नैवेद्यापैकी काही वाटा ताईंच्या शिरडी मुक्कामात त्यांना दररोज मिळण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

* * *

## हेमाडपंतांचे साईभक्त चिरंजीव

# डॉ. गजाननराव दाभोलकर



● 'साईसच्चरित्रकार' गोविंदराव दाभोलकर यांचे चिरंजीव डॉ. गजाननराव सध्या बांद्रा येथे सेंटमार्टिन्स रोडवर बांद्रा स्कूल ऑफ आर्टचे शेजारी रहातात. ते त्यांचे स्वतःचे घर. त्यांच्या घराचे नाव आहे 'साईनिवास' गोविंदरावांनी आपल्या साई पोथीची रचना केली ती याच घरात केली. याच घरात स्वतः बाबांनी त्यांचेकडे मूर्ती पाठविली. या मूर्तीचा उल्लेख साईसच्चरित्रात ४० व्या अध्यायात आहे, व ही मूर्ती त्यांच्यावरील निवासी पहावयास सापडते. बाबा गोविंदरावांना 'हेमाडपंत' या लाडक्या पण खरोखर भरपूर व्यापक अर्थ भरलेल्या सार्थ नावाने हाक मारीत असत. या दाभोलकरांचे एकुलते एक चिरंजीव श्री. गजाननराव आज ७६ वर्षांचे आहेत. ते एल. सी. पी. एस. डॉक्टर. १९२१ ते १९७१ पर्यंत ५० वर्षे त्यांनी यशस्वीपणे वैद्यकीचा व्यवसाय केला. पुढे अर्धांगवायूचा झटका त्यांना आला

त्यातून ते सावरले खरे पण आपल्या व्यवसायाला त्यांनी कायमचा रामराम ठोकला. आज त्यांची शरीर प्रकृती छान आहे.

आपण आपल्या वडीलांबरोबर प्रथम शिरडीला बाबांच्या दर्शनास गेलो. त्यावेळी आपले वय १३–१४ वर्षांचे होते. मशिदीत आपणास प्रथम बाबांचे दर्शन घडले. मी बाबांच्या पायाशी बसलो असताना 'बापू' म्हणून त्यांनी मला हाक मारली व मला जवळ घेऊन गोंजारले, कुशीत घेतले. त्यावेळी मला अक्षरशः गहिवरून आले. बाबांच्या स्पर्शामुळे मी सुखावलो व तेव्हापासून मी जे साईभक्त झालो तो अगदी आजतागायत. आज मला जशी जमेल तशी पूजाअर्चा करतो खरी पण दर गुरुवारी न चुकता बाबांची आमच्या वरी इतमामाने आरती मात्र नक्कीच करतो असे डॉ. दाभोलकर सांगतात. डॉ. दाभोलकरांचा संपूर्ण परिचय श्रीसाईलीला मे ७८ च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे.

☆ ☆ ☆

## श्री. पांडुरंग दिक्षीतांचे माता-पिता

# श्री. सखारामपंत व सौ. सीताबाई दिक्षीत सांगतात

● खारचे रहिवासी व सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्री. पांडुरंगराव दीक्षित यांचे वडील श्री. सखारामपंत यांचे वय आज ९३ वर्षांचे आहे व त्यांच्या पत्नी सीताबाई यांचे वय ८३ आहे. साईबाबा हे त्यांचे आराध्य दैवत. त्यांचे दर्शन त्यांनी आपल्या ऐन तारुण्यात शिरडीत घेतलेले आहे. बाबांनी त्या उभयतांना आपल्या स्वहस्ते उदी लावलेली आहे. बाबांची चिलीम पिण्याची मोठी भाग्याची संधी त्यांना लाभली होती. ज्या भक्तांच्या अंतःकरणात शिरडीला जाण्याची आत्यंतिक ओढ असेल त्यालाच बाबा अगदी खेचून शिरडीला आणतात ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे असे हे दीक्षित दांपत्य सांगते. आपला मुलगा पांडुरंग आपल्या उदरात असताना त्याला बाबांचा स्पर्श झालेला आहे व मी आपला हा मुलगा भावी आयुष्यात कलागुण संपन्न व्हावा अशी इच्छा बाबांच्यापुढे प्रगट केली होती व ती आज अक्षरशः खरी झाली आहे असे सौ. सीताबाई दीक्षित सांगतात. आज मी जो कलाक्षेत्रात यशस्वीपणे वावरतो आहे तो केवळ बाबांच्यामुळे होय असे स्वतः श्री. पांडुरंग दीक्षित सांगतात.

दीक्षित दंपतींचा परिचय श्रीसाईलीला जून १९७७ च्या अंकात सविस्तरपणे प्रसिद्ध झाला आहे.

# कोल्हापूरचे डॉ. रा. सी. कापडी

● जन्म १८९६ एप्रिल ६, रामनवमी. जन्मस्थळ–संगमेश्वर, जि. रत्नागिरी. संभाजीला पकडले ते ऐतिहासिक स्थळ. लहानपणापासून सामाजिक कार्य करण्याकडे प्रवृत्ती. समाज सेवेचा पींड. मराठी चवथी पास झाल्यावर पुढील सर्व शिक्षण मुंबईला. १९१७ ला मॅट्रीक झाल्यावर पिढीजात तंबाखूच्या व्यापारात पडावे की शिक्षण घ्यावे ? ही दोलायमान मनाची अवस्था. शिर्डीला १९१८ साली मे महिन्यात बाबांनी समाधी घेण्यापूर्वी त्यांचे दर्शन–शिक्षण चालू ठेवण्याबद्दल बाबांनी सांगितले. मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमधून एम्. बी. बी. एस. परीक्षा पास—लहानपणापासून संतांच्या दर्शनाची ओढ—साईबाबा, सिद्धारूढ, नारायण महाराज उपासनी बाबा, माधवनाथ महाराज, हरीकाका, आण्णा गइनी, गगनविहारी स्वामीस्वरूपानंद, गुळवणीमहाराज वगैरे संतांचे दर्शन घेऊन साईबाबा म्हणून शिरडीला वाऱ्या केल्या आहेत. अनेक संतांची चरित्रे वाचली, लिहिलीं, अध्यात्मिक लेख लिहिले. साईदर्शन, स्वराज्यसीमा, दैवी संकेत, छत्रपती कोण, वैभवाचे डोहाळे, माळेतील मणी वगैरे नाटके लिहिली. रंगभूमीवर आणली. अनेक भूमिका केल्या. महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत भाग घेतला, स्वातंत्र्य सैनिक म्हणून सुतकताईपासून हातमाग चालविण्यापर्यंत काम केले. गुरुकूल पद्धतीवर वैश्यविद्याश्रमात मुख्याध्यापकाचे काम केले. चहापासून दारूमाडीपर्यंत कोठलेही व्यसन नाही.

नाट्याचा लहानपणापासून छंद. तो पुढे कोल्हापुरात करवीर नाट्यमंडळात उपाध्यक्षपदी काम करीत असता आजपर्यंत चालू. ग्राहक सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्थेचा आतापर्यंत अध्यक्षांचे ८४ वर्षापर्यंत चालू आहे. ४०–५० वर्षे वैद्यकीय व्यवसाय यशस्वीपणे केला. आता शिवाम्बु निसर्गोपचार महामंडळाचा अध्यक्ष, शिवांबु विषयक पुस्तक लिहीत आहे, एका शैक्षणिक संस्थेचा अध्यक्ष. अशी लहान मोठी अनेक सामाजिक कामे करीत आहे. शरीर अनेक रोगांचे म्युझियम झाले असून वय चौऱ्यांशी वर्षे पर्यंत आहे. वर्तमानपत्रांतून आरोग्यावर अनेक लेख लिहिले आहेत, लिहीत आहे.

साईबाबांची पोथी दररोज थोडीतरी वाचतो. त्यांच्या कृपेने मानसिक स्वास्थ्य मिळाले आहे. योगासने घालतो. साईबाबांची तसबीर देव्हाऱ्यात दररोज पूजली जाते. विभूती घेतो लावतो. लोक आश्चर्य करतात. मी इतका तगडा कसा. साईबाबाच सामर्थ्य देतात. बाबांवर श्रद्धेने सर्व भार टाकला म्हणजे बाबा म्हणतात शरण मज आला आणि वायां गेला। दाखवा दाखवा ऐसा कोणी। ३ मुलगे, १ मुलगी. तीन डॉक्टर झाले आहेत. प्रसिद्ध साहित्यिक भाऊसाहेब खांडेकर यांची एक BA. BEd. माझी सून आहे. साईबाबांची कृपा.

# मी पाहिलेले श्रीसाईबाबा

— श्रीकृष्ण गणपतराव कोठारे
साई मंझील, १५१ लेडी जमशेटजी रोड,
माहीम, मुंबई ४०० ०१६

• माझा जन्म १९०३ साली झाला. लहानपणापासूनच म्हणजे १९१०–११ सालापासून शिरडीचे श्रीसाईबाबा यांच्या दर्शनास वरचेवर जात असे. मामाघरची मंडळी ही साईबाबांची उपासक होती. हनुमान लेनमधील त्यांच्या घरात साईबाबांचा एक मोठा फोटो होता. दर गुरुवारी साईबाबांची भक्तमंडळी (आमचे नातेवाईक) रात्री ९ वाजता एकत्र जमून साईबाबांची आरती भजन करून तीर्थप्रसाद घेऊन रात्री ११ वाजता परत जात. असेच एका गुरुवारी आम्ही मामांकडे गेलो होतो त्या दिवशी आम्हाला साईबाबांच्या आरतीचा लाभ झाला. त्यावेळेस माझे आई व वडील इतके प्रभावीत झाले की त्यावेळेपासून ते साईबाबांचे भक्त झाले, व वरचेवर शिर्डीस जाऊ लागले. आम्ही मुलेही त्यांच्याबरोबर साईबाबांच्या दर्शनास जात असू.

मी ८ वर्षांचा असताना माझ्या वडिलांबरोबर शिरडीस गेलो होतो. आईच्या बाळंतपणाचे दिवस भरत आल्याकारणाने ती शिरडीस आली नव्हती. ह्यां बाळंत-पणाचे वेळी विशेष काळजी घेण्यास डॉक्टरांनी सांगितले होते, म्हणून वडिलानी शिरडीस जाऊन सर्व परिस्थिती साईबाबांना निवेदन केली. त्या वेळेस हल्लीप्रमाणे एस. टी. सर्व्हीस नव्हती. कोपरगावाहून बैलगाडीने शिरडीस जावे लागे. बैलगाडीने आम्ही सायंकाळी ४ वाजता शिर्डीस पोहोचलो. त्या वेळी भक्तमंडळींची राहण्याची सोय तेथील रहिवाशांच्या घरी करीत असत. तेथील पाटलाचे घरी आमची राहण्याची व्यवस्था केली होती. सामानसुमान ठेवून सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास साई-बाबांच्या दर्शनास गेलो. त्यावेळी साईबाबा स्नान करून भक्तमंडळीना दर्शन देण्यासाठी मशिदीत बसलेले होते. त्यावेळी ते कोणावर तरी रागावले होते. कारण ते त्यावेळी हातवारे करून कोणास शिव्या देत होते. आम्ही सर्व मंडळी थोडी घाबरलो होतो. वडिलांनी मला धीर दिला व आम्ही त्यांच्याजवळ जाऊन बसलो. मी मुंबई-हून आणलेली दुधी हलव्याची पुडी साईबाबांच्या हातात दिली व सांगितले 'बाबा आईने हा प्रसाद दिला आहे' बाबांनी पुडी हातात घेतली व परत माझ्या हातात देऊन म्हणाले की आईला हा प्रसाद दे. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे बाबांना वाहिलेला प्रसाद मशिदीच्या वाड्यात वाटावयास बाबा सांगत असत. परंतु मी बाबांच्या हातात दिलेली दुधी हलव्याची पुडी बाबांनी मला आईला नेऊन दे असे

सांगितले. तेथे बसलेल्या आमच्या मंडळींना व त्याचप्रमाणे इतर मंडळींना हे ऐकल्यावर आश्चर्य वाटले. माझ्या वडिलांनी आईची परिस्थिती बाबांच्या कानावर घातली व तिची सुटका सुखरूपपणे होऊ द्या अशी प्रार्थना केली. तेव्हा बाबांनी वडिलांकडे पाहून 'अल्ला अच्छा करेंगा' असे शब्द उच्चारिले तेव्हा लगेच वडिलांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेवले व बाबांनी त्यांच्या मस्तकावरून हात फिरविला. मुंबईत परत आल्यावर मी आईला सर्व हकीगत सांगितली ते ऐकून तिला आनंद झाला व तिच्या मनाचे समाधान झाले. प्रसाद भक्षण केल्यावर आठ दिवसानी ती सुखरूपपणे बाळंत झाली व बाबांच्या आशीर्वादाची मला व माझ्या वडिलांना प्रचिती आली.

# चित्रकार जयकरांचे वयोवृद्ध चिरंजीव श्री. शूरसेन शामराव सांगतात—

— श्री. शूरसेन शामराव जयकर
'पूर्णिमा', परांजपे बी स्कीम,
विलेपारले, मुंबई

● १९१६ साली डिसेंबर महिन्यामध्ये आमचे वडील श्री. शामराव रामचंद्र जयकर आमच्या मातोश्री व आम्ही आठ बंधूसह शिरडीत दाखल झालो. वडिलाना मधुमेहाचा विकार होता, व मुंबईत व्यवसायात अपयश आल्यामुळे साईबाबांच्या सेवेत काही दिवस काढावे म्हणजे मनाला काही हुरूप लाभेल अशी त्यांची अपेक्षा होती. डिसेंबर १९१६ ते मे १९१७ पर्यंत आमचा तिथे मुक्काम लांबला. एप्रिल महिन्यात आमचे वडील बंधू श्री. वीरसेन शामराव जयकर कंटाळून मुंबईस नोकरी पाहाण्याकरिता वडिलांचे मामेबंधू श्री. आनंदराव बाबासाहेब अजिंक्य ह्यांच्या घरी निघून गेले. मी मातोश्री व ६ बंधूसहित (कारण एक बंधू श्री रघुनंदन हगवणीच्या आजारात मृत्यू पावला होता) मे महिन्यात शिरडी सोडून मुंबईस आजोळी दाखल झालो. कारण मला स्वतःला रोजगार पहाणे जरूर होते व लहान बंधूंचे शिक्षण शिर्डीच्या मुक्कामात स्थगित झाले होते. आमचे वडील नंतर ४ महिन्यानी गिरगावात श्री. मोगरे ह्यांच्या जागेत आमच्या बिऱ्हाडी दाखल झाले. ह्या आमच्या ६ महिन्यांच्या मुक्कामात विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे श्रीमती सारजाबाई

...दोरकर ह्यांच्याकडे आम्ही शेवटले तीन महिन्यात विनामूल्य आश्रय घेतला होता. ...ा वडिलाना काही पेन्शन नव्हते की बँकेत खाते नव्हते. पण मुंबईतून त्यांच्या ...ष्यमंडळीकडून (कारण ते आर्टिस्ट होते) त्यांनी मागितले की पैशांचा पुरवठा ...ंदा झाला होता. सहा महिन्यांच्या मुक्कामात पहिले काही दिवस श्री. दिक्षि- ...ंच्या धर्मशाळेत राहिलो होतो. काही वेळा शिरडी गावात बाळावाण्याकडे भाड्याने ...ागा घेतली होती व शेवटचे महिने श्रीमती सारजाबाई ह्यांच्याकडे काढले पण ...वढ्या अवधीत परकीय गाव, नात्यागोत्याचे कोणी नाही असे असता आमच्या ...१/१० मंडळीना उपासमारीचा एकही प्रसंग आला नाही. वडील शेवटास एकटे ...सारजाबाईकडे रहात असत व श्रीमती सारजाबाईनी आमच्या वडिलांची जी सेवा ...केली त्याची फेड आमच्या कातड्याचे जोडे करून दिले असते तरी झाली नसती. ...साईबाबांच्या बैठकीला डॉ. पिल्ले नावाचे नागपूरचे एक पेन्शनर डॉक्टर सकाळ ...संध्याकाळ बसून साईबाबांच्या चिलमिला हातभार लावीत असत. वडील एकटे ...शिरडीस असताना डॉ. पिल्ले काही दिवस परगावी गेले होते. तेव्हा आमच्या ...वडिलांना साईबाबांच्या चिलिमीची सेवा घडली व अशी सेवा करीत असताना ...साईबाबांनी वडिलाना कांही गुह्य गोष्टींचा खुलासा केला. पुढे वडिलांनी आमच्या ...मातोश्रींना सर्व हकीकत सांगितली तेव्हा मातोश्री आश्चर्यचकित झाल्या. आमचा ...एक बंधू शिरडीस स्वर्गवासी झाल्यापासून मातोश्री साईबाबांवर रुष्ट झाल्या होत्या, ...ण वडिलांचा खुलासा ऐकल्यापासून ते आम्हाला बजाऊन सांगत की त्या साईबाबां- ...संबंधी कांही बोलल्या असल्या तरी आम्ही मुलांनी साईबाबांसंबंधी कांही अनुचित ...बोलू नये. त्या सांगत सर्वकाही आपल्या कर्माचे फळ आहे.

वडिलानी शिर्डीला जाताना साईबाबांचे एक तैलचित्र बरोबर घेतले होते, व शिरडीस पोहोचल्यावर वडिलानी ते तैलचित्र साईबाबांच्या हाती दिले. हेतू हा की बाबांच्या हस्तस्पर्शाचे चित्र आपल्याला सदैव पुजेला लाभावे. पण बाबांनी ते चित्र चावडीवर लगाव म्हणून सांगितले. बाबांचे बोलणे वडिलाना कांही समजले नाही पण त्यांच्या मनाचा विरस मात्र झाला होता. वडील मुंबईस परतल्यावर काही वर्षे ते तैलचित्र आमच्या घरीच होते. पण साईबाबांच्या समाधीनंतर अंदाजे ७ वर्षांनी हरि सिताराम दिक्षित वगैरे बाबांच्या भक्तमंडळीनी वडिलांच्याकडून ते चित्र एक सफाई हात मारुन व फ्रेम, काच वगैरे बसवून शिरडीस नेले व साईबाबांच्या बैठकी ठिकाणी त्याची स्थापना केली. अशा रीतीने साईबाबांच्या मूळ उद्गाराप्रमाणे तैलचित्राची विल्हेवाट झाली.

शिरडीस आमचा मुक्काम असताना साधारण एप्रिल महिन्यामध्ये साई- बाबांच्या एका भक्ताने त्याला काही कामात यश मिळाले म्हणून बाबांना एक हजार

रुपये पाठविले होते. आमच्या वडिलांना वाटले की बाबांनी संमति दिली तर वरील तैलचित्र शिरडीस योग्य ठिकाणी लावावे व वरील हजार रुपयातून किंमतीदाखल बाबांजवळून काही पैसे मागावेत. त्याप्रमाणे त्यांनी बापूसाहेब जोग म्हणून एक अत्यंत सच्छिल गृहस्थ नेहमी बाबांना दुपारची आरती करीत असत व बाबांचे विश्वस्तही असत, त्यांना विचारले व त्यांनी बाबांना विचारण्याचे कबूल केल्यावर बापूसाहेब जोग, त्यांच्यामागे आमचे वडील व वडिलांच्या मागे कांही दर्शनेच्छू मंडळी अशी बाबांच्या मशिदीमध्ये प्रवेश करती झाली. साईबाबांनी बापूसाहेब जोग पायरीजवळ आल्याबरोबर त्यांना वाड्यात जाऊन पोथी वाचण्यास सांगितले व इतर मंडळींनी खालच्याखाली उदी घेऊन परत फिरावे अशी आज्ञा केली. आम्हाला जरा आश्चर्य वाटले व बाबांना सर्वकाही ज्ञात असावे अशी खात्री वाटू लागली. आमच्या वडिलांना जरा वाईट वाटले, पण बाबांनी स्पष्ट दर्शविले की वडिलांचे घेणे शिरडीत नव्हते व ते मुंबईत होते. कारण वडील मुंबईस आल्यावर आर्टिस्ट म्हणून सांताक्रूझ येथे नरोत्तमदास भानजी म्हणून एक श्रीमंत व गुणवेत्ता व्यापारी होता त्याकडे त्यांना वसतीला जागा व भरपूर काम मिळाले. साईबाबांच्या समाधीनंतर शिरडीची तात्या पाटील, माधवराव देशपांडे वगैरे बरीच भक्त मंडळी श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान ह्यांच्या बंगल्यात काही दिवस मुक्कामास आली होती. त्यांनी शेठ नरोत्तमदास भानजी ह्यांच्या निवासातील वडिलांच्या स्टुडिओला भेट दिली व वडिलांसारखे नामांकित चित्रकारानी साईबाबांच्या सहवासात दीर्घकाळ रहावे म्हणून आश्चर्य प्रगट केले.

आता शेवटी मी शिरडी सोडण्यापूर्वी साईबाबांचा निरोप घेण्यास घरातील मंडळीसह गेलो असता साईबाबांनी मजजवळ फक्त आठ आणे मागितले. साईबाबा दर्शनेच्छू मंडळीजवळ पैसे मागतात म्हणून बराच प्रचार पुण्याच्या पत्रातून झाला होता. असे असता माझ्याजवळ फक्त आठ आणे मागण्यात बाबांचा हेतू मला सुचविण्याचा होता की माझी श्रद्धा अर्धवट होती आणि पूर्णविचाराअंती मला खात्री वाटते की त्यावेळी माझी मनःस्थिती तशीच होती. आता आयुष्याच्या संध्यासमयी मनाला उपरती तर आली आहेच. पण एका साक्षात्कारी विभूतीचा सहवास ६ महिने लाभण्यास पूर्वपुण्याईपेक्षा वाडवडिलांची पुण्याई कारणीभूत असावी असेच वाटते, व बाबांच्या समाधीनंतर सांताक्रूझ येथे आलेल्या भक्तमंडळीतील बाबांचे एकनिष्ठ भक्त श्री. माधवराव देशपांडे ह्यांच्याशी चर्चा करताना त्यांनी पण गहीवरून सांगितले की वाडवडिलांची जबर पुण्याई पाठीशी म्हणून एका विभूतीची वर्षानुवर्षे निकटची सेवा घडली व मनाला विषण्णता आली तरी त्या विभूतीची मनाला सदोदित जागृती देण्यातच श्री. देशपांडे मनाला आवर घालीत.

● ● ●

# श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

## श्रीसाईबाबांचे चित्र काढा व बक्षिस मिळवा

# आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त

### अभिनव चित्रकला स्पर्धा

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीतर्फे आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त एक नाविन्यपूर्ण चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा भारतीय व परदेशांतील सर्व विद्यार्थी मुलामुलींना खुल्ली असून त्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क नाही. या स्पर्धेचे दोन गट पाडण्यात आले असून चित्रकारांनी पुढील नियम व अटी पाळून आपआपली चित्रे काढावयाची आहेत.

गट नं. १ : **वयोमर्यादा ६ ते ९ वर्षे फक्त :** श्रीसाईबाबांचेच पेन्सीलीने काढलेले कोणत्याही अवस्थेतील चित्र, मग ते आशिर्वादात्मक, पाषाणावर बसलेले, साधे बसलेले, शामा घोड्यासमवेत इ. कोणत्याही अवस्थेतील असो.

गट नं. २ : **वयोमर्यादा १० ते १६ वर्षे :** श्रीसाईबाबांचे गट क्र. १ मध्ये वर्णन केल्याप्रमाणेच कोणत्याही अवस्थेतील पण तीन किंवा चार रंगांनी रंगविलेले चित्र.

नियम : १) सर्व चित्रे १० इंच लांब व ८ इंच रुंद अशा पांढऱ्या ड्रॉइंग पेपरवरच चितारलेली असावीत. चित्र काढताना सुयोग्य मर्यादा चारी बाजूंना सोडावी.

२) चित्रकाराने चित्र पाठविताना चित्राच्या वरील बाजूचे उजव्या कोपऱ्यात आपले संपूर्ण नाव, पत्ता, वय, शिकत असलेली इयत्ता, शिक्षणसंस्थेचे नाव इ. सुस्पष्ट लिहावे. तसेच चित्र स्वतः काढलेले असल्याचा आपल्या गुरुजींच्या सहीचा दाखला अवश्य पाठवावा.

३) एका चित्रकारास स्पर्धेसाठी फक्त एकच चित्र पाठविता येईल. चित्रकाराचे पालक श्री साईलीला इंग्रजी किंवा मराठी अंकाचे वर्गणीदार असले पाहिजेत व त्यांनी आपला वर्गणीदार क्रमांक सोबत लिहावा.

४) चित्रे पाठविण्याची अखेरची तारीख **३१ ऑगष्ट १९७९** ही आहे.

या तारखेनंतर आलेल्या कोणत्याही चित्राचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

५) प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ अशी चित्रे निवडली जातील. यशस्वी स्पर्धकांची नावे **श्रीसाईलीला** दिवाळी अंक १९७९ मध्ये जाहीर केली जातील.

६) स्पर्धेसाठी आलेल्या सर्व चित्रांचे प्रदर्शन श्रीसाईबाबा संस्थान शिरडी येथे दिवाळीत भरविले जाईल.

७) यशस्वी चित्रकारांना रीतसर निमंत्रण देऊन त्यांचा जानेवारी १९८० मध्ये भरणाऱ्या **श्रीसाईलीला** लेखक–कवींच्या मेळाव्यात यथोचित सत्कार केला जाईल.

प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकास रु. ५१, दुसऱ्या क्रमांकास रु. ३१, व उत्तेजनार्थ स्पर्धकास रु. ११ अशी रोख बक्षिसे संमेलन अध्यक्षांचे हस्ते दिली जातील.

८) चित्रे टपालाने किंवा समक्ष पाठवून देण्याचे पत्ते :–

१) मे. कोर्ट रिसीव्हर साहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. (पिन ४२३१०९)

**किंवा**

२) संपादक, श्रीसाईलीला, साई निकेतन,
८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४.

९) चित्रे असलेल्या आवरणांवर "श्रीसाईबाबा चित्र स्पर्धा" असा स्पष्ट उल्लेख करावा.

१०) दोन्ही गटातील प्रथम क्रमांकाची चित्रे श्रीसाईलीला मासिकात यथावकाश छापली जातील.

संयोजक
**सदानंद चेंदवणकर**

**श्री क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
**श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.**

फोन : ३५४३३७

श्रीसाईबाबा ट्युटोरिअल ॲकॅडमीज्

# ज्युनिअर कॉलेज क्लासेस

( १२ वी आर्टस् / कॉमर्सचे स्पेशल क्लासेस )

क्षत्रिय निवास, गिरगांव पोर्तुगीज चर्च, लाखाणी बुक डेपो समोर

वैशिष्ट्ये :—सर्व विषय सोप्या भाषेत शिकविले जातात. सर्व विषयांच्या संपूर्ण सायक्लोस्टाईल्ड नोटस् व बोर्डाच्या परीक्षेकरितां अपेक्षित प्रश्न ( सायक्लोस्टाईल्ड उत्तरासह ) दिले जातात व प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

## आपल्याला माहित असेलच की,

( १ ) गेली ३५ वर्षे आम्ही इंटर आर्टस्चे क्लासेस चालवित होतो.

( २ ) प्रत्येक वर्षी आमचे विद्यार्थी, विद्यार्थिनी युनिव्हर्सिटी परीक्षेत मानाची स्थाने मिळवित. व १९७५ साली आमची विद्यार्थिनी युनिव्हर्सिटी परीक्षेत पहिली आली व अनेक बक्षिसे व स्कॉलरशीप्स मिळविल्या.

( ३ ) महाराष्ट्राचे उर्जामंत्री नामदार श्री. शंकरराव चव्हाण, कै. नामदार श्री. भाऊसाहेब हिरे, चीफ जस्टीस ऑफ इंडिया नामदार श्री. वाय्. व्ही. चंद्रचूड, मुंबईच्या स्मॉल कॉजेस कोर्टाचे माजी चीफ जस्टीस श्री. नारायणदास शहा, माजी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. आठल्ये व भवन्स हजारीमल सोमाणी कॉलिजचे प्रिन्सिपॉल श्री. शशिकांत पारेख, अंबिका सिल्क मिल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुरेंद्र मेहता, कामानी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नवीन कामानी यांची मुलेसुद्धां आमच्या क्लासमधून पास होऊन गेली.

बॅचेस :—सकाळ, दुपार, संध्याकाळ ( सोईस्कर वेळा )

ॲडमिशन्स जोरात सुरू आहेत. त्वरा करा. मर्यादित जागा.